बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे



गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ३९ | बुधवार,दि.३१ ऑगस्ट २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# अभियंत्याच्या कानशिलात लावणारा दिवस ठरला सोमवार



**गोंदिया:** लगतच्या ग्राम मुर्री येथील एका ग्राहकाची वीजजोडणी कापली या प्रकरणाला घेऊन रागावलेल्या आमदार विनोद अग्रवाल यांनी ग्रामीण उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता राजेश कंगाले यांच्या कानशिलात लगावली.ही घटना सोमवारी (दि.२९) सायंकाळी ५ वाजता दरम्यान सूर्याटोला उपविभाग कार्यालयात ही घटना घडली.तर सायकांळी ३-४ वाजेच्या सुमारास जिल्हा परिषदेच्या गणेशनगर स्थित उपविभागीय अभियंता कार्यालयातही एका कंत्राटदाराने आपल्या साथीदारासह कनिष्ठ अभियंत्याला धोपटल्याने सोमवारचा दिवस हा अभियंत्याच्या कानशिलात लावणारा दिवस ठरला.

दोन्ही घटनेनंतर मात्र अधिकृत तक्रार कुठल्याही पोलीस ठाण्यात दाखल झाली नाही.आमदार अग्रवाल यांनी रामनगर पोलिसांच्या समक्ष माफी मागितली तसेच सदर अभियंत्यानेही यापुढे चुका होणार नसल्याची ग्वाही दिली.तसाच प्रकार गणेशनगर येथील कार्यालयात कंत्राटदाराने मारहाण केल्यानंतर वरिष्ठांच्या उपस्थितीत माफी मागितली.दोन्ही प्रकरणत माफीनाम्यानंतर शांत झाले असून या दोन्ही प्रकरणातील मार खाणारे अधिकारी हे मागासवर्गातील असून अनु,जाती जमाती कायद्यानुसार त्यांना सरंक्षणही आहे,हे विशेष.

वीजअभियंत्यांनी दिलेल्या माहितीनुसार,लगतच्या ग्राम मुर्री निवासी लारोकर यांच्यावर ११,००० रुपयांचे वीजबिल असून यासाठी वीज अभियंता शुक्रवारी त्याच्याकडे गेले होते. यावर त्याने (दि .२९) बिल भरतो असे म्हणत वेळ मागितली. मात्र सोमवारी बिलाच्या रकमेतील ४००० रुपये भरतो व उर्वरित रक्कमनंतर भरणार असे म्हटले.यावर त्याची वीजजोडणी कापण्यात आली.या प्रकरणाला घेऊन आमदार अग्रवाल महावितरणच्या सूर्याटोला येथील उपविभाग कार्यालयात गेले व तेथे उपस्थित असलेल्या उपकार्यकारी अभियंत्यांना एक-दोन नव्हे तर तब्बल पाच झापड मारल्या.

## कंत्राटदाराची कनिष्ट अभियंत्याला मारहाण

**गोंदिया जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम उपविभागांतर्गत येत असलेल्या गणेशनगर स्थित उपविभागीय अभियंता कार्यालयातील कनिष्ठ अभियंता मेश्राम यांना कार्यालयीन वेळेत कपडे फाटेपर्यंत गोंदियातील खंबू अग्रवाल नामक कंत्राटदारांने मारहाण केल्याची घटना २९ ऑगस्ट रोजी घडली. या घटनेच्या वेळी कार्यालयात हजर असलेला एकही अधिकारी कर्मचारी मदतीकरीता धावून गेला नाही.मारहाण सुरु असतानाच अभियंता तेजसिंह दमाहे हे कार्यालयात पोचले असता त्यांनी मारहाण सोडवण्यासाठी पुढाकार घेत दोन्ही पक्षांना शांत केले.त्यानंतर कार्यालयात वातावरण बिघडल्याचे लक्षात येत मारहाण करणारे कंत्राटदार यांनी संबधित कनिष्ठ अभियंत्याची माफी मागितल्याने सदर प्रकरणात पोलिसात तक्रार करण्यात आली आहे.**

याप्रकारामुळे संतापलेल्या वीज अभियंत्यांना लगेच रामनगर पोलीस ठाणे गाठून आमदारांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. तसेच या घटनेला घेऊन अभियंत्यांनी असहकार आंदोलन सुरू केले होते.गुन्हा दाखल होतपर्यंत आंदोलन सुरू राहणार अशा इशारा दिला होता,मात्र वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या समन्वयांने प्रकरण शांत करुन तक्रार मागे घेण्यात आली.

गोंदिया विधानसभा मतदारसंघातील आमदार विनोद अग्रवाल यांच्या चाबी संघटनेचे व भाजपचेही काही नेते रामनगर पोलिस ठाण्यात दाखल झाल्यानंतर पोलिसांच्या उपस्थितीतच विज वितरण कंपनीचे अधिकारी तसेच पिडीत अंभियता यांच्यात चर्चा झाली.या चर्चेत हे प्रकरण संपवून सदर प्रकरणातील तक्रार मागे घेण्यात आली.

दरम्यान आमदार विनोद अग्रवाल यांच्याशी चर्चा केली असता गेल्या अनेक महिन्यापासून विजेचे भारनियमन नसतानाही भारनियमन केले जात आहे. त्यासंदर्भातही अनेकता बोलण्याचा प्रयत्न केला परंतु उत्तर व्यवस्थित दिले गेले नाही. आज जेव्हा संबधित ग्राहक आपल्या कार्यालयात आला तेव्हा माझ्या स्वीय सहायाने अभियंत्यांशी बोलणी करुन ग्राहक जेवढे पैसे भरत आहे तेवढे घेत ८ दिवसात उर्वरित पैसे भरत असल्याचे सांगण्यात आले. मात्र त्यानी ऐकले नाही,त्यामुळे मी विज वितरण कार्यालयात गेलो आणि तिथे कार्यकारी अभियंत्यांशी चर्चा करीत अभियंत्याला समज देण्याचा प्रयत्न केला. मी लोकप्रतिनिधी असून मला जनतेच्या समस्या सोडवयाच्या असल्यानेच मी माझी भूमिका मांडल्याचे आमदार विनोद अग्रवाल यांनी सांगितले. अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर करीत जनतेला त्रास देत असल्याचे सागंत जर कुठला ग्राहक अर्धे पैसे भरायला तयार असेल तर त्याचा विज पुरवठा कापता येत नाही असेही ते म्हणाले.

# सरकारला घोषणांचा विसर

## ओबीसी वसतिगृहांचा प्रश्न रेंगाळलेलाच; ३ सप्टेंबरला तालुकास्तरावर देणार निवेदन

**गोंदिया** : राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात मुला-मुलींसाठी दोन स्वतंत्र असे ७२ वसतिगृह दिले जातील, अशा घोषणा सरकारने मागे केल्या; मान्यताही दिली गेली. परंतु, घोडे कुठे अडले कुणास ठाऊक, अजूनही ओबीसी विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहांचा प्रश्न रेंगाळलेलाच आहे. सरकारला घोषणा किंबहुना निर्णयाचा विसर पडला आहे. यात होतकरू विद्यार्थी मात्र, उच्च शिक्षणापासून वंचित राहात आहेत. दरम्यान, सरकारने त्वरित पाऊल उचलून हा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ओबीसी,व्हीजेएनटी,एसबीसी समन्वय समितीसहत ओबीसी संघटनांकडून होत आहे.




भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना महाराष्ट्रातील ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थी मात्र उच्च शिक्षणापासून वंचित आहेत. विदर्भातील सर्व सामाजिक

ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी संघटनांच्या माध्यमातून १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत मंडल यात्रा काढण्यात आली होती. या यात्रेदरम्यान संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी जवळपास ३५ ठिकाणी भेटी दिल्या. १५ हजारांच्यावर सामान्य ओबीसींच्या समस्या जाणून घेतल्या. ग्रामीण भागात शिक्षण व रोजगाराच्या योग्य सोयी उपलब्ध नसल्याने ओबीसींच्या न्याय मागण्या पूर्ण व्हाव्यात, हीच हाक सामान्य ओबीसींची होती, असे दिसले. ५२ टक्के असलेल्या महाराष्ट्रातील ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समुदायातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेण्यास अनेक अळथळे येत आहेत. उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शहरात वास्तवास राहावे लागते. परंतु, विद्यार्थ्यांना शहरात मोफत निवास व भोजनाची व्यवस्था उपलब्ध नसल्याने गरीब ओबीसी होतकरू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत.

उल्लेखनीय म्हणजे,महाराष्ट्र विधान मंडळाच्या इतर मागासवर्ग कल्याण समितीच्या ऑक्टोबर २०१५ मधील पुणे दौऱ्यात जिल्हास्तरावर मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी नवे शासकीय वसतिगृहे सुरू करण्याची शिफारस राज्य सरकारला केली गेली होती. चार वर्षानंतर म्हणजे, जानेवारी २०१९ ला सरकारच्या मंत्रिमंडळात मान्यता दिली गेली होती.

मागील महायुतीच्या देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या सामाजिक न्याय विभागाच्या ३० जानेवारी २०१९ च्या शासन आदे-शानुसार ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी ३६ वसतिगृहांना मान्यता मिळाली होती.

उद्धव ठाकरे सरकारमध्ये बहुजन कल्याण मंत्र्यानी प्रत्येक जिल्ह्यात मुला-मुलींसाठी दोन स्वतंत्र असे ७२ वसतिगृहे होतील, अशा घोषणा अनेकदा केल्यात.परंतु, या घोषणा अजूनही हवेत विरल्या आहेत. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालये सुरू झाली आहेत. गरीब ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थी शहरात उच्च शिक्षणासाठी येण्यास उत्सुक आहेत.

परंतु, गुणवत्ता असूनही वसतिगृहे नसल्याने अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सरकारने त्वरित पाऊल उचलणे गरजेचे आहे. घोषणेप्रमाणे वसतिगृहे देणे गरजेचे आहे. असा सूर आता ओबीसी संघटना आणि विद्यार्थ्यांमधून उमटत आहे.

सरकारला त्यांच्या घोषणांची किंबहुना निर्णयाची आठवण करून देण्यासाठी ओबीसी संघटना आता पुढे सरसावल्या आहेत. येत्या ३ सप्टेंबर रोजी तालुकास्थळावर तहसीलदारांना निवेदन देण्यात येईल.याउपरही सरकारने वसतिगृहे सुरू करण्यासंदर्भात हालचाली सुरु न केल्यास तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी समन्वय समितीने दिला आहे.

# जिल्ह्यातील जीर्ण पुलांचा प्रश्न ऐरणीवर

## संबंधित विभागाचे दुर्लक्ष; अनेक मार्गावर कठडेरहित पूल: नागरिकांचा जीव धोक्यात

**गोंदिया:** दरवर्षी पावसाळ्यात पुराच्या पाण्यात काही जणांचा वाहून जीव जातो. आणि जिल्ह्यातील मुख्य रस्त्यासह ग्रामीण भागातील रस्त्यांवरील ग्रामीण भागातील रस्त्यांवरील नदी, नाल्यांच्या जीर्ण व कठडे नसलेल्या पुलाचा प्रश्न ऐरणीवर येतो. मात्र, पावसाळा संपताच काही दिवसातच याचा विसर शासनासह प्रशासनाला होवून फाईल बंद केली जाते. यंदाही काही दिवसांपुर्वी आलेल्या पुरात काहीजण वाहून गेल्याच्या घटना राज्यात घडल्या. आणि जिल्ह्यातील कठडेरहित पुलांसह रस्त्यांचा प्रश्न निर्माण झाला. मात्र, आता पावसाळा आपल्या अंतिम टप्प्यात असतानाच पुन्हा शासनकर्त्यांना या प्रश्नाचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. अद्यापही अनेक कठडेरहित व धोकादायक जीर्ण पुलाच्या दुरुस्तीच्या कसल्याच हालचाली दिसून येत नाही. त्यामुळे या पुलांना अपघाताच्या थराराची प्रतीक्षा असल्याचे चित्र आहे.

जिल्ह्यात अनेक मार्गावर विकास कामे होत असली तरी प्रत्यक्षात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्ते व त्यावरील कठडेरहित पुल नागरिकांच्या जीवावर उठले आहे. तिरोडा, देवरी, सडक अर्जुनी आदी सर्व तालुक्यातील तालुका ते जिल्हा मुख्यालयाला जोडणाऱ्या रस्त्यांवर असेच काही पुल मृत्यूला आमंत्रण देत आहेत. त्यापैकीच एक गोरेगाव-म्हसगाव या जिल्हा मार्गावरील पांगोली नदीवरील जीर्णपूल आहे. तालुका मुख्यालयापासून अवघ्या दीड किमी अंतरावर असलेल्या घोटी, म्हसगाव, कालीमाटी मार्गावरील पांगोली नदीवर ३६ वर्षापुर्वी लहान पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. विशेष म्हणजे, जुन्या बांधकामानुसार या पुलाची उंची कमी असतानाच हा पूल पूर्णत: जीर्ण झाला आहे. त्यातच अनेक अपघात व पुराच्या पाण्याने या पुलावरील कठडे बेपत्ता झाले आहे.





तर संबंधित विभागाकडून कसल्याच प्रकारच्या दिशादर्शक फलक अथवा सुचना या पुलावर लावण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या मार्गावरील ये-जा करणाऱ्यासाठी हा पुल कर्दनकाळच ठरु पाहत आहे. विशेषत: असे शेकडो जीर्ण पुल जिल्ह्यात असून संबंधित विभागाच्या दुर्लक्षपणा व लोकप्रतिनिधींच्या अनास्थेमुळे हे पुल आता अपघाताच्या व थराराच्या प्रतीक्षेत आहेत.

केवळ आश्वासन: पांगोली नदीवर ३६ वर्षापुर्वी लहान पुल तयार करण्यात आले होते. पुल पूर्णत: जीर्ण झाला असून या पुलापासून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता आहे. परिसरातील नागरिकांकडून दरवर्षी या पुलाचा प्रश्न लोकप्रतिनिधीसमोर मांडला जातो. विशेषत: काही महिन्यापुर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागासह जिल्ह्यातील आजी-माजी आमदार, खासदार, माजी मंत्री, बांधकाम विभागाचे मंत्री यांच्याकडे नव्या पुलाच्या बांधकामासाठी साकडे घालण्यात आले. मात्र, नेहमीप्रमाणे केवळ आश्वासनच मिळाले.

### राष्ट्रीय महामार्गाची हीच अवस्था

**गोंदिया-कोहमारा या राज्य मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा बहाल करण्यात आला. मात्र, या मार्गाचे बांधकाम हे घोटीपर्यंतच करण्यात आले. त्यामुळे या राष्ट्रीय मार्गाचे कोहमारापर्यंतचे बांधकाम थंडबस्त्यात असून या मार्गावर अनेक ठिकाणी अपघात प्रवणस्थळ आहेत. त्यापैकी जानाटोला ते भडंगा या गावाच्या मधात असलेला चेपटा पूल हा अनेक वर्षापासून कठडे रहित असून दुर्लक्षीत आहे. तर डव्वा ते खजरी दरम्यानचा पूल हा अरुंद असल्याने या पुलावर नेहमी अपघात घडतात.**

### तो मार्गही जीवघेणा

**गोरेगाव व तिरोडा तालुक्याला जोडणारा व महत्वाचा मानला जाणारा गोरेगाव ते डाकराम सुकडी मार्गही जीवघेणा असाच आहे. हा मार्ग नागझिरा अभयारण्यातून जात असतानाच या मार्गावर अनेक लहान पुल आहेत. पैकी अर्ध्या अधिक पुलावर कठडेच बसविण्यात आलेले नाहीत. तर या मार्गावरुन दरदिवशी एसटी बस, ऑटोरिक्षा, काळीपिवळी व इतर वाहनांची वर्दळ असते.**

# रुग्णवाहिकेच्या चालकांवर उपासमारीची वेळ

**गोंदिया:** रुग्णांना रुग्णालयात नेण्यासाठी २४ तास दक्ष असणाऱ्या १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिका चालकांना गेल्या सहा महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक संकट ओढवले आहे. अनेकवेळा मानधन जमा करण्याची मागणी करण्यात आली, मात्र याकडे दुर्लक्ष केले जात आहे. तर जिल्ह्यात १०२ रुग्णवाहिकेचे ७६ चालक कर्तव्य बजावत असून गेल्या सहा महिन्यांपासून हे चालक मानधनाच्या प्रतीक्षेत आहेत.

गंभीर आजाराने ग्रासलेल्या आणि आपत्कालीन परिस्थितीत गर्भवती महिलांना रुग्णवाहिका सेवा दिली जाते. त्यासाठी रुग्णवाहिका चालकांना प्रत्येक क्षणी सतर्क राहावे लागते. यापूर्वी "एनआरएचएम'मधून रुग्णवाहिका चालकांची नियुक्ती होत होती, मात्र गेल्या तीन वर्षांपासून खासगी कंपनीमार्फत कंत्राटी पद्धतीवर चालकांची नियुक्ती दिली जात आहे.

विशेष म्हणजे, रुग्णवाहिका चालकांना महिन्याकाठी १३ हजार ५०० रुपये मानधन दिले जात असून, त्यापैकी पीएफ व इतर योजनांतर्गत मानधन कपात करुन ९००० रुपये चालकांच्या खात्यात जमा होतात.



कमी मानधनामुळे वाहनचालक आधीच आर्थिक संकटात जात असून, अशा परिस्थितीत गेल्या ६ महिन्यांपासून म्हणजे मार्च २०२२ पासून आतापर्यंत मानधन मिळालेले नाही. त्यामुळे चालकांच्या कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे.

**"एनआरएचएम' अंतर्गतच रुग्णवाहिका चालकांची नियुक्ती करावी -**

गोंदिया जिल्ह्यात ७६ रुग्णवाहिका चालक आहेत. तीन वर्षांपासून खासगी संस्थेतून रुग्णवाहिका चालकांची नियुक्ती केली जात आहे. तर, "एनआरएचएम' अंतर्गतच रुग्णवाहिका चालकांची नियुक्ती करावी, अशी संघटनेची मागणी आहे. त्याचबरोबर मागील ६ महिन्यांचे थकीत मानधन तात्काळ चालकांच्या खात्यावर जमा करावे, असे निवेदन देण्यात आले आहे, असे कंत्राटी चालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शेखर चंद्रिकापुरे यांनी सांगितले.

### रुग्णवाहिकेचा रस्ता अडवल्यास १० हजार रुपयांचा दंड

**गंभीर आजारी रुग्णांना दवाखान्यात नेणाऱ्या रुग्णवाहिकांना रस्ता मोकळा करुन देणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. मात्र अनेकदा समोरील वाहनचालक रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करुन देत नाही.अनेकदा रुग्णवाहिका चालकाला रुग्णाला रुग्णालयापर्यंत घेऊन जाण्यास उशीर होतो. प्रसंगी रुग्णाचा जीवही जाऊ शकतो. त्यामुळे आता नवीन वाहन कायद्यानुसार, रुग्णवाहिकला रस्ता मोकळा करुन न दिल्यास १० हजार रुपयांचा दंड होऊ शकतो. त्यामुळे वाहनधारकांनी या नियमांची कटाक्षाने अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.**

### शहरात सर्रास उल्लंघन

**शहरातील प्रमुख मार्गावर वाहनांच्या गराड्यात रुग्णवाहिका अडकल्याचे चित्र अनेकवेळा पहावयास मिळते. ते विशेष म्हणजे रुग्णवाहिकेचा सायरन वाजविल्यानंतरही वाहने बाजूला होत नाहीत, त्यामुळे रुग्णवाहिका चालकाला वाहनाच्या गराड्यातून रस्ता काढताना कसरत करावी लागते. शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असे प्रकार होतात. अशा वेळी वाहतूक पोलिसांनी कठोर भूमिका घेऊन रुग्णवाहिकेला रस्ता मोकळा करुन देणे गरजेचे आहे.**

## कर्जमुक्तीसाठी आधार बँक खात्यास लिंक करा,शेतकऱ्यांसाठी ५ सप्टेंबरपर्यंत मुदत

**भंडारा** : महात्मा जोतीराव फुले शेतकरी सन्मान योजना अंतर्गत पिक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रूपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. ही रक्कम शेतकऱ्यांच्या बचत खात्यामध्ये वर्ग होणार असून त्यासाठी वापरात असलेले बँक खाते ५ सप्टेंबर पुवी आधार कार्डशी लिंक केलेले असणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे आधारकार्ड, बचत खाते नाही त्यांनी तातडीने काढून ते आधारलिंक करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, यांनी केले आहे.आधार कार्ड नसलेल्या शेतकऱ्यांस तात्काळ आधार कमांक काढण्यास सांगावे व मोबाईल क्रमांक आधारकार्डशी लिंक करण्यांस सर्व शेतकऱ्यांना कळवावे .

# नागपूर ते हावडा मार्गावरील ५८ रेल्वे गाड्या झाल्या रद्द

## ३० ते ७ सप्टेंबरपर्यंत गाड्यांचे चाक थांबणार

**गोंदिया:** नागपूर ते रायपूर दरम्यान दुसऱ्या लोहमार्गाचे काम प्रगती पथावर आहे. त्यामुळे नागपूर ते रायपूर-हावडा या मार्गावर धावणाऱ्या २२ दैनिक प्रवासी रेल्वे गाड्या व ३६ साप्ताहिक प्रवासी गाड्या असे एकूण ५६ गाड्या रेल्वे प्रशासनाने ३० ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान रद्द केल्या आहे. रद्द करण्यात आलेल्या रेल्वे गाड्यांचे चाक थांबविण्यात येत असल्याबाबतचे तारखेनिहाय वेळापत्रही रेल्वे प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे नागपूर अंतर्गत येत असलेल्या दुर्ग-इतवारी दरम्यान तिसऱ्या लोहमार्गाचे काम प्रगती पथावर आहे. दुर्ग ते राजनांदगाव, राजनांदगाव ते पनियाजोब, पनियाजोब ते बोरतलावचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित खंडाचे काम युद्ध पातळीवर सुरु आहे. तुमसर रोड ते काचेवानी दरम्यान लोह मार्गाचे काम सुरु असल्याने कामात व्यत्यय येवू नये म्हणून रेल्वे प्रशासनाने या मार्गावरील एकूण १२९ प्रवासी व जलद रेल्वे गाड्यांपैकी ५८ रेल्वे गाड्यांचा प्रवास ३० ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत थांबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात ज्या रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्या रेल्वे गाड्यांचा तारखेनिहाय वेळापत्रही रेल्वे प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामुळे दुर्ग ते गोंदिया ते नागपूर दरम्यानच्या ५८ रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या. त्यामुळे या मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांनी या बाबीची दखल घ्यावी, अशी सुचनाही रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आल्या.



### रद्द करण्यात आलेल्या रेल्वे गाड्या

**३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबरपर्यंत: दुर्ग-गोंदिया स्पेशल, गोंदिया-दुर्ग, गोंदिया-इतवारी(मेमू) इतवारी-गोंदिया, रायपूर-इतवारी स्पेशल, कोरबा-इतवारी, कोरबा-अमृतसर, बिलासपूर-भगत की कोठी**

**३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर- टाटा-इतवारी, शालीमार एक्सप्रेस (अप-डाऊन), हावडा मेल, मुंबई मेल, हावडा-अहमदाबाद, अहमदाबाद-हावडा, आझादहिंद (हावडा), आझाद हिंद(पुणे), इतवारी-रिवा**

**३१ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर- इतवारी-रायपूर, इंटरसिटी एक्सप्रेस (अपडाऊन), पोरबंद-शालीमार**

**३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबर- अमृतसर-कोरबा, हटिया-एलटीटी, शालीमार-पोरबंदर**

**३ सप्टेंबर ते ७ सप्टेंबर- कोरबा-कोचीवेल्ली, बिकानेर-बिलापूर**

**३ सप्टेंबर ते ६ सप्टेंबर-बिकानेर-बिलापूर**

**१ ते ५ सप्टेंबर-कोचीवेल्ली-कोरबा**

### विदर्भ व महाराष्ट्र एक्सप्रेस नागपूर वरुन धावणार

**लोहमार्गाचे काम प्रगतीपथावर असल्याने रेल्वे प्रशासनाने नागपूर ते रायपूर मार्गावरील रेल्वे गाड्या रद्द केल्या आहेत. रद्द गाड्यांमधील गोंदिया येथून सुटणाऱ्या विदर्भ व महाराष्ट्र एक्सप्रेस या दोन्ही रेल्वे गाड्यांचा प्रवास नागपूर पासून सुरु होणार व समाप्त होणार आहे. ३९ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरपर्यंत गोंदिया-मुंबई व मुंबई-गोंदियापर्यंत धावणारी विदर्भ एक्सप्रेस नागपूर येथून सुटणार व समाप्त होणार आहे. त्याच प्रमाणे ३० ऑगस्ट ते ६ सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्र एक्सप्रेसचा प्रवास नागपूर पासून सुरु व समाप्त होणार आहे.**

### एक दिवसासाठी रद्द गाड्या

**३१ ऑगस्ट गांधीधाम-पुणे, १ सप्टेंबर रोजी हावडा-शाहीनगर, बिलापूर-पुणे, २ सप्टेंबर रोजी हटिया-पुणे, पुणे-बिलासपूर, ३ सप्टेंबर कामाख्या, संत्रागाच्छी-पुणे, मालदा-सुरत, शाहीनगर-हावडा, पुरी-गांधीधाम, ४ सप्टेंबर रोजी पुणे-हटिया, त्रिनुवेल्ली-बिलासपूर, ओखा-शालीमार, एलटीटी-पुरी, ५ सप्टेंबर पुणे-संत्रागाच्छी, सुरत-मालदा, ६ सप्टेंबर बिलासपूर-त्रिनुवेल्ली.**

# महाज्योतीवरील अशासकीय संचालकांच्या नेमणुका नव्या सरकारने केल्या रद्द!

**गोंदिया:-** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या ओबीसी विजेएनटी व एसबीसी विद्यार्थी व समाजासाठी स्थापन झालेल्या संस्थेवर तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने,अशासकीय संचालक म्हणुन नेमलेले प्रा. दिवाकर गमे, डॉ. बबनराव तायवडे व लक्ष्मण वडले यांच्या नियुक्ता २८ ऑगस्ट २०२२ रोजी रद्द केल्या आहेत.त्यामुळे महाज्योती ही संस्था सध्या संचालकाविना असून या ३ संचालकांच्या जागेवर येण्यासाठी भाजपमध्ये जोरदार रस्सीखेच सुरु असल्याची चर्चा आहे. त्यातच शिंदेगटाला मात्र एकही संचालक पद जाणार नसल्याचेही वृत्त हाती आले आहे.

११ ऑगस्ट २०२० ला शासन निर्णय काढुन महाविकास आघाडी सरकारने ३ अशासकीय संचालकांची नियुक्ती केली होती.या कालावधीत महाराष्ट्र शासनाकडुन सुमारे ८२४ कोटी रूपयाचा निधी आणून, महाज्योतीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध योजना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आला. मात्र सकारात्मक धोरण राबविणारा व्यवस्थापकीय संचालक व मंत्री न मिळाल्याने पहिले दीड वर्ष असेच गेले हे सुद्धा तेवढेच महत्वाचे राहिले. विद्यमान सरकारकडून या संस्थेवरील विद्यमान व्यवस्थापकीय संचालकाला सुध्दा हटविणे गरजेचे आहे.

३० जुन ला राज्यात सत्ताबदल झाल्यावर नविन शिंदे फडणविस सरकारने, जुन्या नियुक्त्या कुठलेही कारणे न देता रद्द करण्याचा सपाटा सुरू केलेला होता. त्याचाच भाग म्हणुन महाराष्ट्र शासनाने, महाज्योतीवरील तीनही अशासकीय संचालकांच्या नेमणुका शासन निर्णय काढुन रद्द केल्या आहे.

महाज्योतीवर निर्मितीनंतर प्रथम संचालक म्हणुन, महाज्योतीची ओबीसी विद्यार्थीभिमुख योजनांची बांधनी करण्याची, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी काम करण्याची संधी मिळाली. ओबीसी विद्यार्थ्यांसाठी स्वातंत्यांच्या ७२ वर्षानंतर विविध लाभाच्या व स्पर्धा पुर्व प्रशिक्षणाच्या मोफत योजना राबविण्यात आल्या. वर्ग ११ वी सायंस मधे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना जेईई निट चे मोफत ऑनलाईन प्रशिक्षण, त्यासाठी मोफत ब्रँडेड कंपनीचा टॅब, व दररोजचे सहा जीबी इंटरनेट असे उपक्रम सुरू केले.

महाज्योतीच्या वतीने आगामी तीन वर्षात प्रत्येक ओबीसी विजेएनटी विद्यार्थ्यांच्या घरी महाज्योतीचा टॅब ही महाज्योतीची संकल्पना राबविली.ओबीसी विद्यार्थ्यांना मोफत कमर्शियल पायट ट्रेनिंग सुरू करून, सामान्य ओबीसी विद्यार्थ्यांचे पायलट बणविण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले.

ज्ञानज्योती सावित्री बाई फुले यांच्या जन्मगावी नॅशनल डिफेंस अकादमी स्पर्धा पुर्व, २०० मुलींचे मोफत निवासी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला गेला आहे.मात्र २०२३ मध्ये जेईई नीट परिक्षा देणाया विद्यार्थ्यांना अद्यापही अर्धे शैक्षणिक सत्र लोटूनही टॅब पुरविण्यात व्यवस्थापकीय संचालक अपयशी ठरलेले आहेत.असे व्यवस्थायपकीय संचालक ओबीसी योजना व मंडळाला अपयशी ठरविण्यासाठीच काम करीत असल्याचे दिसून येत आहे.

## संपादकीय

# आमदारांचा गोंधळ..नॉट ओके

विधानभवनाच्या पायऱ्यांवर झालेली सत्ताधारी आणि विरोधक आमदारांमधील धक्काबुक्की माध्यमक्रांतीच्या आशिर्वादाने अवघ्या महाराष्ट्राने थेट पाहिली. अर्थात कुठल्याही सुजाण नागरिकाला ती रुचणारी नव्हती. मात्र जनता, माध्यमं यांचा धाक उरलेला नाही हे लक्षात येऊन देखील अनेक वर्ष लोटली आहेत. लोकप्रतिनिधींचे हे वर्तन कुठल्या एका पक्षपुरता मर्यादित नाही. यांत आता कुठलाही पक्ष मागे नाही. लोकशाहीची हत्या, लोकशाही साठी काळा दिवस हे निव्वळ औपचारिक शब्द राहिले असून त्यामागचे गांभीर्य केव्हाच संपले आहे. अशावेळेस या बेजबाबदार वर्तनाचे होणारे दुष्परिणाम केवळ लोकप्रतिनिधींपुरताच मर्यादित नाही.

या सगळ्या गोंधळावर विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना प्रतिक्रिया देताना, जे काही चाललेय ते बरोबर नाही, असे सांगत आपल्या आमदारांना समज दिली आणि त्या सर्वांना सभागृहाच्या दिशेने ते घेऊन गेले. खरं म्हणजे अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून विरोधी पक्षांच्या म्हणजे राष्ट्रवादी, काँग्रेस आणि शिवसेनेच्या आमदारांनी "पन्नास खोके, एकदम ओक्के', "ओला दुष्काळ जाहीर करा, गाजर देणे बंद करा', "पूरग्रस्तांना मदत करा', अशी घोषणाबाजी सुरू केली होती. त्याला प्रत्युत्तर म्हणून शिंदे गट आणि भाजपचे आमदार यांनी चक्क पाचव्या दिवशी "लवासाचे खोके, बारामती ओक्के', "वाझेचे खोके, मातोश्री ओक्के'अशी घोषणाबाजी सुरू केली. या घोषणाबाजीदरम्यान राष्ट्रवादीचे अमळनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अनिल पाटील यांनी शिंदे-फडणवीस सरकारला डिवचण्यासाठी तसेच सरकारचा निषेध व्यक्त करण्यासाठी गाजराचा हार आणला. थोड्या वेळानंतर त्यांनी तोच हार गळ्यात घातला आणि त्यांच्यासह विरोधी पक्षांच्या आमदारांनी जोरजोरात घोषणाबाजी करायला सुरुवात केली. याचवेळी त्यांच्या गळ्यातील हार हिसकावून घेण्यासाठी शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले हे पुढे सरसावले. त्यांनी आमदार पाटील यांच्या गळ्यातील हार हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. हे पाहून अनिल पाटील यांच्या मदतीला मिटकरी धावून आले. त्यांनीही अनिल पाटील यांच्या बाजूला थांबून जोरजोरात घोषणा द्यायला सुरुवात केली. मग हार हिसकावण्यासाठी गोगावले, महेश शिंदे हे मिटकरी यांच्या दिशेने गेले. या गोंधळात दोन्ही बाजूंचे आमदार एकमेकांना भिडले. विधान भवनाच्या पायऱ्यांवर हा राडा झाल्यानंतर अमोल मिटकरी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली. सुरुवातीला महेश शिंदे यांनी शिवीगाळ केल्याची तक्रार अमोल मिटकरी यांनी केली आहे, तर मिटकरी यांनीच आपल्याला धक्काबुक्की केल्यानंतर पुढील सगळ्या गोष्टी घडल्या, असे महेश शिंदे यांनी म्हटले आहे. जनतेने आपल्याला का निवडून दिले याबाबतचे कोणतेही सोयरसुतक त्यांना राहिलेले नाही.

महाराष्ट्रातला शेतकरी ओल्या दुष्काळाने त्रस्त आहे. अतिवृष्टीने पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांना नुकसानभरपाई मिळालेली नाही. महाराष्ट्रातल्या रस्त्यांची तर चाळण झाली आहे. सर्वत्र खड्ड्यांचे सम्राज्य दिसत असून या खड्ड्यांतून वाट काढताना हजारो लोकांचे बळी गेले आहेत. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर नुकताच विनायक मेटेंसारख्या राजकीय नेत्याचा मृत्यू झाला आहे. मृत्यूचा सापळा बनलेल्या या महामार्गावरील मृत्यू रोखण्याच्या उपायांची चर्चा होणे बाकी आहे. ओबीसी आरक्षणाचा तिढा कायम आहे. मराठा आरक्षणाचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले आहे. हे आणि यासारखे जनतेचे असंख्य प्रश्न अजून सुटलेले नाहीत आणि आपले आमदार मात्र एकमेकांच्या कुचाळक्या करण्यात, भिडण्यात व्यस्त दिसत आहेत. विशेषत: लोकशाहीच्या या मंदिरात सर्वांनी तारतम्य बाळगणे नितांत गरजेचे आहे. विधिमंडळ म्हणजे कायदेमंडळ. तिथे आमदारच कायदा हातात घेताना दिसताहेत, राडा घालताहेत. मग गरीब बिचाऱ्या, नाडलेल्या जनतेने दाद मागायची तरी कुणाकडे? असा प्रश्न या गोंधळानंतर आ-वासून उभा राहिला आहे. खरं तर तुमचे-आमचे प्रश्न मांडण्यासाठी आमदार विधिमंडळात जात असतात, पण तेच आमदार जर तिथे जाऊन एकमेकांची उणीदुणी काढत, गावगुंडांसारखे भिडत असतील, तर कुणाकडे दाद मागावी. एकूणच "आमदारांनी घातला राडा आणि विकासाचा अडला गाडा', असे नाईलाजाने म्हणण्याची वेळ आली आहे. त्यामुळे "काय ते आमदारः काय ती भाषा आणि काय तो राडाः अजिबातच नॉट ओक्केः', अशी चर्चा सर्वत्र सुरूझाली आहे.

महिन्याभरापूर्वी घडलेल्या सत्तांतरानंतर त्याचे पडसाद अजूनही उमटत असून महाराष्ट्राचा गाडा अजूनही रुळावर आलेला नाही. सध्याची राजकीय साठमारी पाहता राज्याला अजून काय पाहावे लागणार याचे आडाखे बांधता येतात. पण या सर्व निरुपयोगी घडामोडीत गोरगरीब जनता होरपळली जाते याचे मात्र या लोकांना अजिबात भान नाही. सत्ता ही लोककल्याणासाठी असते याचे भान कुठे तरी हरपत चालले आहे हे या राजकीय नेत्यांना तेव्हाच लक्षात येईल जेव्हा जनता त्यांच्यावर आपला राग मतपेटीतून व्यक्त करेल. सामान्य जनतेच्या हाती सध्या तरी तेवढेच आहे. अवघी २५ ते ३० टक्के मतं घेऊन निवडणुका जिंकता येतात हे राजकारण्यांना लक्षात आल्यापासून त्यांना मतपेटीची खरंच किती भीती राहिली आहे? हा मोठा प्रश्नच आहे. मतदानापुरते राजकारण हा निव्वळ भ्रम असून सातत्याने कुरघोडी करणे, आपले उपद्रवमूल्य दाखवून देणे हा राजकारण्यांचा आवडता उद्योग होतांना दिसतो आहे. यापासून सामान्य जनता असो वा त्या राजकीय पक्षांचे तथाकथित समर्थक यांनी वेळीच सावध होणे गरजेचे आहे. अन्यथा याचे वाईट परिणाम सर्वांनाच भोगावे लागू शकतात. थोडक्यात सध्याचा काळ हा संक्रमणाचा असून महाराष्ट्राच्या राजकारणाचा डीएनए बदलतो आहे. राज्याच्या राजकीय संस्कृतीला नवे आव्हान निर्माण झाले आहे.

याशिवाय अजून एक चिंतेची बाब म्हणजे घडलेल्या दुर्दैवी घटनेचे माध्यम आणि समाजमाध्यमात जे पडसाद उमटले आहे त्याकडे सजगतेने बघणे गरजेचे आहे. २४ तास चालणाऱ्या वृत्तवाहिन्या आणि समाज माध्यमांवरील तथाकथित राजकीय वीर आगीत तेल ओततांना दिसत आहेत. ज्याचे त्याचे मर्यादित असे सत्य आहे आणि तोच काय खरा आहे या अविर्भावात विवेकाचा आवाज कुठेतरी दाबल्यासारखा दिसतो आहे. नव्या काळाची ही नवी आव्हान पेलताना समाजाची होणारी ससेहोलपट मनाला विषन्न करणारी आहे. जनतेला हे जरी आवडले नसले तरी त्याविरुद्ध काही असंतोष उमटला असे काही नाही. मात्र या सर्वांचा कधी ना कधी स्फोट होणारच हे देखील नाकारता येत नाही. नेतेमंडळी सध्या या खेळात मश्गुल असली तरी त्याचे चटके त्यांना बसतील. मग काही प्रस्थापितांची डॅमेज कंट्रोल करणारी यंत्रणा कामाला लागेल आणि बळी जाईल तो त्या लोकप्रतिनिधींचा जे तुलनेने नवीन आहेत. अद्याप त्यांची नाळ लोकांशी जुळली आहे. मग तेव्हा हे लोक न्याय कोणाकडे मागतील?

राजकारणी आता कोणाच्या ऐकण्याच्या मन:स्थितीत नाहीत. त्यांनी सर्व काही मॅनेज केले आहे. यंत्रणा त्यांना हवं नको ते बघता आहेत. धाक नावाची कुठली गोष्ट त्यांना वाटत असेल याची काही शाश्वती नाही. मात्र ही परिस्थिती का निर्माण झाली याचा विचार आता तरी जनतेने आता तरी करावा. लोकांनी या सर्व गोष्टींकडे कानाडोळा केला म्हणूनच आज हे "दंडेलशाही" चे चित्र आपल्याला पाहावे लागत आहे. महाराष्ट्रात किती सण, जयंत्या सार्वजनिक कार्यक्रम साजरे होत असतांना त्याचा "खर्च" राजकीय लोकांनी करावा असा समज काही म्होरक्यांनी करून घेतला आणि राजकारण्यांच्या काळ्या कमाईत आपला देखील "वाटा" आहे हे राजकारण्यांना सुचवले. त्यांना देखील हे सोयीचेच होते. परिणामी आजचे उत्सव हे दिखाऊ, उधळपट्टी करणारे असे स्वरूप येत गेले. मात्र या सर्वात त्या उत्सवांच्या मागे असलेले "सत्व" आपण गमावले. राजकारण्यांकडे बोट दाखवतांना समाजाची देखील नैतिकता कशी ढासळत गेली याचा विचार आता तरी सुज्ञ नागरिकांनी करावा. होणाऱ्या दंडेलशाहीचा निषेध करायचा असेल तर आपल्या हितसंबंधांना मुरड घालावी लागेल नाहीतर त्यांच्या पखाली वाहण्याला पर्याय नाही. होणाऱ्या दंडेलशाहीचा विजय असो ही घोषणा देतांना या तथाकथित समर्थकांना पर्याय असणार नाही.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# जिल्हा बँकेने वाटले १७१.४१ कोटींचे पीक कर्ज



**गोंदिया:** यंदा मृग नक्षत्राच्या सुरवातीला अत्यल्प झालेल्या पावसामुळे हंगामच कोरडा जातो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, नंतर झालेल्या दमदार पावसामुळे पेरणीसाठी पोषक वातावरण तयार झाले. खरीप हंगामात जिल्ह्यात २ लाख २० हजार हेक्टर आर क्षेत्र पीक लागवडीखाली असतो. यापैकी सुमारे १ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्रात भाताची लागवड केली जाते. जिल्ह्यात शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळख असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने आतापर्यंत उद्दिष्टाच्या ६७ टक्के पीक कर्जाचे वाटप शेतकऱ्यांना केले आहे.

मागील काही वर्षापासून सुरुवातीच्या काळात पावसाने दिलेल्या दगामुळे यंदाच्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी सावध भूमिका घेतली होती. चांगल्या पावसाने हजेरी लावल्यानंतर अनेकांनी पेरणी केली, त्यामुळे बहुतांश शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे. कृषी विभागाने जिल्ह्यात २ लाख २० हजार हेक्टरसाठी खरिपाचे नियोजन केले होते. यातील १ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्रावर भाताची लागवड केली जाते. उर्वरित क्षेत्रात ऊस, मक्का, हळद, आले, तीळ, तुर, सोयाबीन, भाजीपाला आदी पिके घेतली जातात. जिल्ह्यात जवळपास २ लाख ७२ हजार शेतकरी संख्या आहे यापैकी केवळ ३५ टक्के शेतकरी पीक कर्जाची उचल करतात तर बहुतांश शेतकरी थकीत असल्यामुळे त्यांना पीक कर्जाची उचल करता येत नाही.

दरवर्षी विविध बँकांना शासन पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट देते. परंतु जिल्हा बँक वगळल्यास इतर कोणत्याही बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण करत नाही. परंतु मागील काही वर्षात झालेल्या नापिकीमुळे पीककर्ज थकीत असल्याने त्यांना पीक कर्जाची उचल यंदा करता आली नाही. त्याचा परिणाम पीक कर्ज वाटपाच्या आकडेवारीवर दिसून येते. यंदाच्या खरीप हंगामात जिल्हा बँकेला २५६.८४ कोटी रुपयांचे उद्दिष्ट होते. ३४ हजार ५१८ शेतकऱ्यांना १७१.४१ कोटी रुपयांची कर्ज वाटप केले आहे. इतर बँक त्यापेक्षा जिल्हा बँक शेतकऱ्यांना पीक कर्ज वाटपात अग्रस्थानी आहे. टक्केवारीचा विचार केल्यास उद्दिष्टाच्या ६६.४७ टक्के पीक कर्जाचे वाटप जिल्हा बँकेने केले आहे.

राष्ट्रीयकृत, खाजगी, ग्रामीण बँकांनी दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांना पीककर्ज वाटप करण्यासाठी हात आखडता घेतलेला आहे. बहुतांश शेतकऱ्यांनी पूर्वीचे कर्ज फेडले नसल्यामुळे बँकांनी कठोर भूमिका घेतली आहे. जिल्हा बँक वगळल्यास इतर कोणत्याही बँका पीक कर्जाचे उद्दिष्ट पूर्ण करत नसल्याचे दिसून येते. जिल्ह्यात शेतकऱ्यांची संख्या मोठी असली तरी पीक कर्ज घेण्याची प्रक्रिया किचकट असल्याने बहुतांश शेतकरी बँकांकडून कर्ज घेण्याऐवजी सावकारांकडून पीक कर्ज घेण्यास प्राधान्य देतात. तसेच मागील काही वर्षापासून होत असलेल्या नापिकीमुळे हजारो शेतकऱ्यांनी पीक कर्ज फेडले नसल्याने त्यांना नवीन पीक कर्ज उचल करता येते नाही.

# 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' गणेशोत्सव सजावट देखावा स्पर्धेचे आयोजन



**गोंदिया:** दरवर्षी भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थीला महाराष्ट्रातील गणेश भक्तांच्या घरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये गणेशाचे आगमन होते आणि वातावरण चैतन्याने भरुन जाते. स्वातंत्र्यपूर्ण काळात समाज प्रबोधनासाठी सुरु केलेली सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा महाराष्ट्रात आजही हिरिरीने जपतो आहे. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' या विषयासंबंधी गणेशोत्सव देखावा-सजावट स्पर्धा आयोजित केली आहे. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांबरोबरच वैयक्तिकरित्याही नागरिकांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळे प्रबोधनकर देखावे साकारतात, तसेच घरोघरीही गणेशाची सुंदर आरास केली जाते. सार्वजनिक मंडळांच्या देखाव्यांच्या माध्यमातून आणि घरगुती गणेशोत्सव सजावटीद्वारे सामाजिक संदेश देखील दिले जातात. याच धर्तीवर 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' या स्पर्धेसाठी फोटो आणि ध्वनीचित्रफीत हे साहित्य पाठवायचे आहे. मताधिकार हा १८ वर्षावरील नागरिकांचा कायदेशीर अधिकार आहे. त्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत नोंदवणे आणि मताधिकार बजावणे, मतदार यादीतील दुबार नावे वगळण्यासाठी मतदार ओळखपत्राला आधार कार्ड जोडणे, हे सूत्र केंद्रस्थानी ठेवून मंडळांना देखाव्यांच्या माध्यमातून, तर घरगुती पातळीवर गणेश-मखराची सजावट, गणेश दर्शनासाठी घरी येणाऱ्या भाविकांमध्ये यासंबंधीची जागरुकता करण्यासाठी अभिनव कल्पना राबविता येतील. तसेच मताधिकार बजावताना जात, धर्म, पंथ निरपेक्ष राहून आपला लोकप्रतिनिधी निवडणे, पैसे किंवा इतर आमिषांना बळी न पडता मताधिकार बजावणे, यासारख्या विषयांवर आपल्या देखाव्या-सजावटीतून जागृती करता येऊ शकते. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि समाजमाध्यमांवर सदर स्पर्धेची सविस्तर नियमावली देण्यात आलेली आहे. गणेशोत्सव मंडळांनी आणि घरगुती गणेशोत्सव सजावटीच्या स्पर्धकांनी दिनांक ३१ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर २०२२ या कालावधीत गुगल अर्जावरील माहिती भरुन आपल्या देखावा-सजावटीचे साहित्य पाठवायचे आहे.

या स्पर्धेबरोबरच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमार्फत मतदार ओळखपत्राला आधार कार्डची जोडणी, मतदार नोंदणी, नाव वगळणी, तपशिलातील दुरुस्ती, नविन सुधारणान्वये मतदार नोंदणीसाठी लागू झालेल्या चार अर्हता दिनांक १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर तारखा यांसाठी प्रसार-प्रचार केला जावा आणि अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,गोंदिया यांनी केले आहे.

# राष्ट्रीय पोषण महिना अभियान मिशन मोडवर राबवा- जिल्हाधिकारी

गोंदिया : महिला व बालकांचे आरोग्य व पोषण या स्थितीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी १ ते ३० सप्टेंबर २०२२ हा संपूर्ण महिना राष्ट्रीय पोषण महिना म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या अभियानात सकस आहाराचे महत्व पटवून देणारे नाविन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करून राष्ट्रीय पोषण महिना अभियान मिशन मोडवर राबवावे असे निर्देश जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी दिले. राष्ट्रीय पोषण आहार जिल्हा अभिसरण समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती त्यावेळी त्या बोलत होत्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, नरेश भांडारकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अंबरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे, कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा सुमित बेलपत्रे, समाजकल्याण अधिकारी तुकाराम बरगे व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांमधील खुजे-बुटके पणाचे प्रमाण कमी करणे, ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, ६ ते ५९ महिने वयोगटातील बालकांमधील रक्तक्षयाचे प्रमाण कमी करणे, १५ ते ४९ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुली व महिलांमधील रक्तक्षयाचे प्रमाण कमी करणे व जन्मतः कमी वजनाचे असणाऱ्या बालकांचे प्रमाण कमी करणे हे या पोषण महिना अभियानाची उद्दिष्टे आहेत.

महिला व बालकांच्या आरोग्य व पोषण विषयक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी जनजागृती हा घटक ठरतो. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर आहार विषयक जनजागृती अभियान राबविण्यात यावे अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

पोषण महिना साजरा करण्यासाठी केंद्र सरकारने सुचविलेल्या संकल्पनेवर आधारित उपक्रम आयोजित करण्यात यावेत. यामध्ये स्वस्थ बालक-बालिका स्पर्धा आयोजित करण्यात यावी.

सप्टेंबर २०२२ राष्ट्रीय पोषण महिना हा चार प्रमुख संकल्पनेवर आधारित असावा. महिला आणि आरोग्य, बालक आणि शिक्षण (पोषणाबरोबर शिक्षण), लिंग संवेदनशीलता, जलसंधारण आणि व्यवस्थापन, आदिवासी भागातील महिला आणि मुलांसाठी पारंपारिक खाद्यपदार्थ या त्या प्रमुख संकल्पना आहेत.पोषण आहार जनजागृती ही केवळ मोहिमेपुरती मर्यादित न ठेवता दैनंदिन जीवनात उपयोगात आणली जावी असे अनिल पाटील यांनी सांगितले. आपल्या जिल्ह्यात अतिशय पोषक व उपयुक्त अशा रानभाज्या पिकतात. त्यात मोठ्या प्रमाणात पोषक घटक असतात. आपल्या आहारात त्या त्या सीझनमधील रानभाज्यांचा समावेश असावा ही बाब सुद्धा या अभियानात पटवून देण्यात यावी असे ते म्हणाले. आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती छायाचित्रांसह संकेतस्थळावर अपलोड करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. ङ्गराष्ट्रीय पोषण महिनाफ अभियान लोकचळवळ व्हावी व यात लोकसहभाग मोठ्या प्रमाणात वाढावा अशी अपेक्षा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

# टिप्पर असोसिएशनची कार्यकारिणी गठीत



**गोंदिया:-** जिल्हा टिप्पर असोसिएशन (टॅग)ची कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे. स्थानिक भवभुती रंगमंदिर येथे शुक्रवार, २५ ऑगस्ट रोजी झालेल्या सभेत कार्यकारिणी गठीत करण्यात आली आहे.

स्थानिक भवभुती रंगमंदिर येथे जिल्हा टिप्पर असोसिएशनची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत टिप्पर, ट्रॅक्टर मालकांच्या समस्यावर चर्चा करण्यात आली. महसूल, पोलिस व परिवहन विभागाच्यावतीने टिप्पर, ट्रॅक्टर चालकांना त्रास दिले जात असून, या व्यवसायापासून जुडलेल्या लोकांना याचा फटका बसत आहे. मागील दोन वर्षांपासून हा व्यवसाय पूर्णत: ठप्प होता. डिझेल, इतर साहित्याच्या वाढत्या किंमतीने आधिच व्यावसायिक त्रस्त आहेत. त्यात महसूल, पोलिस व परिवहन विभागाकडून ट्रॅक्टर व टिप्पर चालकांना त्रास देण्याचे काम केले जात आहे. प्रशासनाकडून सकाळी ६ ते रात्री ९ पर्यंत वाहतूक निर्बंध लावण्यात आले आहे. याचा फटका या व्यवसायावर अवलंबून असलेल्या चालक, क्लीनर, मालक, मजूर, कंत्राटदार, बांधकाम व्यवसायांना बसत आहे. करीत प्रशासनाने याकडे लक्ष देऊन समस्या मार्गी लावण्याची मागणी बैठकीत करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलन करणार, असेही ठरविण्यात आले आहे. दरम्यान नविन कार्यकारिणी गठीत करण्यात आली. कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी महेंद्र खंडेलवाल यांची निवड करण्यात आली. सभेत महेंद्र खंडेलवाल, अमर वऱ्हाडे, जसजीत सिंग भाटिया, दीपक बैस, गुड्डू फुंडे, मन्नू लिल्हारे, अमित झा, हरीकिसन चौधरी, गोलू बिसेन, मयुर माधवानी, परवेज, विनायक खरे, भुषण राखडे, दलेश नागदवणे, संजू पटले, सोहेल शेख, गोलू तिवारी, अज्जू जाधन, कारू भगत, पप्पु पटले, रानू तिवारी, बबलु पटले, मनीष लिल्हारे, भरत बहेलिया, राज शुक्ला, राहुल मेश्राम, विष्णू बर्वे, पिंटू, शानू रहांगडाले, दिनेश अग्रवाल, सौरभ चव्हाण, सुनील बचवानी, संजू माने, मो. सेफ सिद्दीकी, आशिष, गुड्डू पटले उपस्थित होते.

# महाज्योतीला मिळाले पुरवणी अर्थसंकल्पात पुन्हा २०० कोटी रूपये!

**गोंदिया:-** ओबीसी व्हीजेएनटी आणि एसबीसी विद्यार्थीसाठी महात्मा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) स्थापना तीन वर्षापुर्वी महाराष्ट्र शासनाने केली. या संस्थेच्या माध्यमातून ओबीसी हितासाठी निर्णय घेणे सुरु असून या आर्थिक वर्षात ४५० कोटी रुपये संस्थेला मिळणार आहेत. त्यातच माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी प्रस्तावित केलेला २०० कोटी रुपयाचा निधीही पावसाळी अधिवेशनात मंजूर झालेला आहे.

महाविकास आघाडी सरकारने दोन वर्षापुर्वी संचालक मंडळ नेमले. ओबीसी बहुजन मंत्री असलेल्या संस्थेच्या अध्यक्षासंह संचालकांनी महाज्योतीच्या विविध ओबीसी विद्यार्थी हिताच्या योजना राबविण्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे निधीची मागणी केली होती. त्यासाठी माजी मंत्री छगनराव भुजबळ यांनी संचालक प्रा.दिवाकर गमे यांच्या पाठपुराव्यामुळे पवार यांच्याकडे निधी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केल्याने भरघोस निधी मिळाला. महाज्योतीला मागील दोन वर्षात त्यांनी ६२४ कोटी रूपयाचा निधी दिला. पण ओबीसी विद्यार्थ्यांच्या विदेशी शिक्षणासाठी तसेच ओबीसी विद्यार्थ्यांसाठी अजुनही वसतीगृहे नसल्यामुळे, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या माध्यमातुन, बाहेर गावी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी ८० हजार रूपये भोजन निवास व निर्वाह भत्ता म्हणुन निधी द्यावा, अशी महत्वाकांक्षी योजना महाज्योतीच्या वतीने प्रस्तावित केलेली होती. त्यासाठी सुमारे १२० कोटीची गरज होती. त्यावेळी तत्कालीन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचेकडे निधीची मागणी केली असता, त्यांनी पुरवणी अंदाजपत्रकात महाज्योतीला २०० कोटीच्या निधीची तरतुद करुन ठेवली होती. व २५ ऑगस्टला संपलेल्या अधिवेशनात महाज्योतीला पुरवणी अर्थसंकल्पात २०० कोटी रूपये मंजुर झाल्याने ओबीसी विद्यार्थ्यांच्या आधार योजनेसाठी निधी उपलब्ध झाल्याची माहिती संचालक प्रा.दिवाकर गमे यांनी देत आता सरकार बदललेल्या पार्श्वभुमिवर संबंधित मंत्री सुध्दा ओबीसींची ही महत्वाकांक्षी योजना महाज्योतीच्या वतीने सुरू करतील, असा विश्वास महाज्योतीचे संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी व्यक्त केला आहे.

महाज्योतीला आतापर्यंत शासनाने ८२४ कोटी रुपयाचा निधी दोन वर्षात मंजुर केला, त्याबाबत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, छगनराव भुजबळ, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणविस आणि विशेषता नविनच ओबीसी मंत्री अतुल सावे यांनी पाठपुरावा करुन, महाज्योतीला २०० कोटी रूपये मंजुर करुन दिले, याबाबत महाज्योतीचे संचालक प्रा. दिवाकर गमे यांनी सर्वांचे आभार मानले आहे.

# हातगाडीने सावरले मयंकचे कुटुंब

## पेन विकणारी चिमुकली जाणार शाळेत सामाजिक दातृत्वाचे उदाहरण



**गोंदिया:** घरी अठराविश्वे दारिद्र्य. वडील तुरुंगात, एक भाऊ आजारी. पोटच्या भाकरीसाठी आपल्या आईला हातभार लावावा म्हणून मुर्री येथील दहा वर्षाच्या मयंकने आपल्या सात वर्षांच्या भावासोबत पेन विकणे सुरू केले. कार्यालये, शहरातील गर्दीचे ठिकाणावर जावून दोन रुपयांना पेन घ्या, पेन म्हणून प्रत्येकाकडेच जात होती. कुणी घेत होते, तर कुणी हुसकावून लावायचे. त्या मुलीकडे सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सविता बेदरकर यांची तहसील कार्यालयात नजर गेली. त्यांनी त्या मुलीला तिच्या कुटुंबाविषयी विचारले असता संपूर्ण परिस्थिती समजली. ही बाब त्यांनी समाजमाध्यमांवर टाकून तिच्या शिक्षणासाठी आईला रोजगाराची गरज असल्याचे सांगितले. अनेकांकडून मदत मिळाली. त्या आर्थिक मदतीतून मयंकच्या आईला हातगाडी आणि चहाची टपरी उघडण्यासाठी साहित्य खरेदी करुन दिले. यातून मयंकच्या आईला घर चालविण्यासाठी साधन मिळाले. आता मयंक आणि तिच्या छोट्या भावाला शिक्षण घेवून पायावर उभे होता येणार आहे.

शासनाकडून सक्तीचे शिक्षण कायदा करण्यात आला. मोफत आणि सक्तीचे शिक्षण ही बाब योग्य आहे. मात्र ज्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत बेताची त्यांना नुसते शाळेत जावून कसे चालेल. घरची चूल पेटणे देखील तितकेच गरजेचे. त्यामुळे अनेक मुले शाळाबाह्य आहेत, हे वास्तव नाकारता येणार नाही. या सर्वाला घरची परिस्थिती हे सर्वात मोठे कारण आहे.

मयंक भवसागर ही अवघ्या दहा वर्षांची चिमुकली. घरी दोन भाऊ आणि आई आहे. घरी कमावता कोणीच नाही. एक भाऊ अंथरुणाला खिळून आहे. त्यामुळे त्याच्या सेवेत मयंकची आई घरीच असते. मिळेल ते काम करुन घर सांभाळते. त्या कमाईतून देखील दोन सांजची भाकरी मिळेल याची शास्वती नाही. त्यामुळे छोट्या मयंकने आपल्या सात वर्षांच्या भावाला सोबत घेवून कधी कार्यालये, कधी चौक, रेल्वे स्थानक परिसर तर कधी घरोघरी जावून पेन विक्री सुरू केली. अनेकांना त्यांची किव येवून गरज नसली तरी पेन खरेदी करायचे, तर कित्येकदा हातात असलेल्या पेन घेवून सायंकाळी घरी जावे लागत होते. समाजसेविका सविता बेदरकर तहसील कार्यालयात आपल्या खासगी कामानिमित्त गेल्या. त्यांच्याजवळ येत "मयंकने मॅडम पेन घ्या ना' अशी पानावलेल्या डोळ्यांनी साद घातली. त्या मुलीची प्रा. बेदरकर यांना दया आली. त्यांनी मायेने मयंकला सर्व परिस्थिती विचारली. मयंकची परिस्थिती ऐकून क्षणभर डोळ्यात पाणीच तरळले.

प्रा. बेदरकर यांनी मुर्री येथील मयंकचे घर गाठले. घरची एकंदरित परिस्थिती बघून त्यांच्या पायाखालची वाळूच घसरली. गरीबी, परिस्थिती आणि दुर्देव बघून काही काळ त्या स्तब्ध झाल्या. मला काम, थोडे पैसे आणि किराणा सामानाची गरज असल्याचे मयंकच्या आईने सांगितले. असे झाल्यास मी माझ्या मुलांना पेन विकू देणार नाही, याची ग्वाही देखील दिली. तातडीने ही सर्व परिस्थिती प्रा. बेदरकर यांनी फेसबूकवर टाकली. ती पोस्ट बघताच गणेश मुनेश्वर, नितीन मोकाशी, मोनिता चौधरी, देशमुख, डॉ. सुजाता ताराम यांनी प्रत्येकी १००० रुपये प्रा. बेदरकर यांच्याकडे पाठविले.

या पैशातून मयंकच्या आईला चहाची टपरी टाकण्यासाठी साहित्य खरेदीची लगबग सुरू झाली. योगेश चहावाला यांनी हातगाडी खरेदी करण्यास मदत केली. योगेशने मयंकची आई आणि बाळांना जेऊ घातले. पायात चप्पल नसल्याने ती खरेदी करुन दिली. पुन्हा घरी नेण्यासाठी केळं विकत घेवून दिले. सर्व साहित्य तयार झाल्यानंतर चहा टपरीसाठी सुसज्ज झालेली टपरी मयंकच्या आईच्या सुपूर्त करण्यात आले. यावेळी विशेष समाज कल्याण अधिकारी श्री मोहतुरे, श्री खेडकर, डॉ. माधुरी नासरे, पौर्णिमा मिश्रा, सोनू भेलावे, प्रिया सोनवणे उपस्थित होते. मयंकच्या आईला आता रोजगाराचे साधन उपलब्ध झाल्याने आता मयंक आणि तिचा भाऊ शाळेत जावू शकणार आहेत.

### शिक्षणासाठी हवी पोटाला भाकरी

**शासन एकीकडे बालहक्क आणि मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या बाता हाकते. मात्र मयंकच्या घरच्या सारखी परिस्थिती असेल तर ते शिक्षण तरी कसे घेणार, असा सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे. शासनाने अशा कुटुंबाचा शोध घेवून त्यांना आधी दोन वेळची भाकरी मिळेल याकरिता आर्थिकरित्या सुदृढ केल्यावरच शासनाचे उद्दिष्ट साध्य होणार आहे.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा नारा दिला. मात्र शिक्षणासाठी समृद्ध वातावरण निर्माण होण्याची गरज आहे. ते शासनाचे काम आहे. मयंकसारख्या गरजवंतांना समाजाने मदतीचा हात देवून त्यांच्या भावी यशस्वी जीवनाची दिशा ठरविण्यास मदत करावी.**

**प्रा. सविता बेदरकर, समाजसेविका**

# गोरेगाव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे यशस्वी आयोजन



**गोरेगावः–** जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्यावतीने गोरेगाव तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे दोन दिवसीय आयोजन लोकमान्य टिळक विद्यालय, मुंडीपार येथे करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक प्रतिकृतींचे प्रदर्शन आणि शिक्षकांनी तयार केलेल्या प्रात्यक्षिकांचे मुल्याकंन करुन दि.२५ रोजी स्पर्धेतील विजेत्या शिक्षक व विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

प्रामुख्याने बक्षीस वितरण कार्यक्रमाला पंचायत समितीचे सभापती मनोज बोपचे, उपसभापती राजकुमार यादव, प्रभारी गटशिक्षणाधिकारी एन. जे. सिरसाटे, गटसमन्वयक एस.बी. खोब्रागडे, एस.एस. बिसेन (मुख्याध्यापक, लो.टी. विद्या. मुंडीपार) केंद्रप्रमुख एच.एस. शहारे, एन.सी. बिजेवार, सौ वैष्णव, कु.रेणुका जोशी तसेच गट साधन केंद्र गोरेगावचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

प्राथमिक विभागात वर्ग ६ ते ८ च्या विद्यार्थ्यांचे एकूण ३९ मॉडेल, माध्यमिक विभागात वर्ग ९ ते १२ चे एकूण १९ मॉडेल, प्राथमिक शिक्षक गटात २ मॉडेल, माध्यमिक शिक्षक गटात २ मॉडेल तसेच प्रयोगशाळा सहाय्यक गटात १ मॉडेल असे एकूण ६३ मॉडेल सहभागी करण्यात आले होते. सदर प्रतिकृतींचे मूल्यमापन जगत महाविद्यालय, गोरेगावचे व्याख्याता प्रा. डॉ.बी.जि. सूर्यवंशी, प्रा.डॉ.एस. एस. रहांगडाले तसेच डॉ. व्ही.यु. रहांगडाले यांनी केले.

सदर प्रदर्शनी मध्ये प्राथमिक गटात प्रथम–कृष्णा रामेश्वर मेळे वर्ग ७ वा जि.प. व प्राथमिक शाळा बोळुंदा, द्वितीय–कु.पायल राकेश लोणबले वर्ग ७ वा जि.प. व प्राथमिक शाळा मुरदोली, तृतीय–कु.अश्मिरा शहनावाजखान पठाण वर्ग ८ वा किरसान मिशन स्कूल गोरेगाव, माध्यमिक गटात प्रथम–गौरव चंद्रप्रकाश घोडेस्वार वर्ग १२ वा एम आय पटेल हायस्कुल सोनी, द्वितीय–कु.मयुरी सुरेश ठाकूर वर्ग १२ वा जि.प. हायस्कुल गोरेगाव, तृतीय–जय नीलचंद पटले वर्ग १० वा परशुराम विद्यालय मोहगाव बु., प्राथमिक शिक्षक गटात प्रथम–सौ.बी.के. कटरे (स.शि.) परशुराम विद्यालय मोहगाव बु., द्वितीय–यु.एस. रहांगडाल `(प.शि) जि प व प्राथमिक शाळा हिरापूर, माध्यमिक शिक्षक गटात–प्रथम–ए.एच.कटरे (स शि), पी.डी.रहांगडाले विद्यालय गोरेगाव, द्वितीय–एस.एम.रामटेके (स.शि.)संजय गांधी विद्यालय तेढा, प्रयोगशाळा सहाय्यक गटात–प्रथम पी.एम.दमाहे सर–स्वती माध्यमिक शाळा घोटी यांनी पारितोषिक पटकावले. सर्व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र, शब्दकोश व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.



बक्षीस वितरण प्रसंगी सभापती मनोज बोपचे यांनी विद्यार्थी व शिक्षकांची स्तुती करीत विद्यार्थ्यांच्या कला,गुणांवर विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले. गटशिक्षणाधिकारी सिरस–टे यांनी सत्र २०२२–२३ च्या नियोजित विज्ञान प्रदर्शनी मध्ये तसेच प्रत्येक उपक्रमात अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करण्यासाठी सर्व शिक्षकांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे संचालन एच.सी.ठाकूर (स.शी) मुंडीपार तसेच सुनील ठाकूर (विषय साधन व्यक्ती, गसाके गोरेगाव) यांनी तर प्रास्ताविक भास्कर बाहेकर (वी.सा.व्यक्ती विज्ञान) यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार गटसमन्वयक एस.बी.खोब्रागडे यांनी मानले.

या दोन दिवसीय आयोजनात प्रामुख्याने लोकमान्य टिळक विद्यालय मुंडीपारचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच गट साधन केंद्र गोरेगावचे सर्व कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केले.

# वयोमर्यादेचा महिला व बालविकास विभागाला विसर

## शासकीय परिपत्रकाला केराची टोपली : पदवीधर अंशकालिन उमेदवारांवर अन्याय

**गोंदिया:** येथील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाने अंशकालिन पदवीधरांसाठी २२ ऑगस्ट रोजी जहिरात प्रकाशित केली. मात्र, महिला व बालविकास विभागाला राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाचा विसर पडला. त्यामुळे वयोमर्यादा असूनही अनेक पदवीधर अशंकालीन उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता बळावली आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २८ मे २०१९ च्या शासकीय परिपत्रकानुसार राज्यातील पदवीधर अंशकालिन उमेदवारांची वयोमर्यादा ४६ वरून ५५ वर्ष करण्यात आली आहे. शासनाचा हा निर्णय शासकीय, निमशासकीय सेवा, शासनाचे उपक्रम, महामंडळे, मंडळे, शासन अनुदानित संस्था अशा सर्वच आस्थापनांवर लागू करण्यात आलेला आहे. अंशकालिन पद–वीधर उमेदवारांची निवड करतांना सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे शासन निर्णयातून निर्देश देण्यात आले. मात्र, असे असतांनाही जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाला या शासन निर्णयाचा विसर पडला आहे.

विभागाने दिनांक २२ ऑगस्ट रोजी सहाय्यक आणि बहुउद्देशिय कर्मचाऱ्यांची तालुकानिहा पदसंख्येसह जाहिरात प्रकाशित केली. मात्र, या जाहिरातीत वयोम र्यादा २५ ते ४५ वर्षे दर्शविण्यात आली आहे. वास्तविकत: पदवीधर उमेदवारांची कमाल वयोमर्यादा शासनाने ५५ वर्षे केली आहे. त्यामुळे जाहिरातील दर्शविण्यात आलेली ४५ वर्षे वयोमर्यादा म्हणजे, शासन निर्णयाचा उल्लंघनच करणारी असल्याचे अनेक उमेदवारांचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, जाहिरात अंशकालिन पदवीधर कम 'चाऱ्यांसाठीच असून सर्वसाधारण अटीमध्ये अंशकालिन पदवीधर उमेदवार असल्याचे प्रमाणपत्र गरजेचे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जाहीरात अंशकालिन कर्मचाऱ्यांसाठीच असून त्यात कोणत्याही प्रकारचे सामाजिक आरक्षण लागू करण्यात आ–लेले नाही. त्यामुळे किमान वयोमर्यादा २५ असली तरी कमाल वयोमर्यादेमध्ये बदल करणे गरजचे आहे. उल्लेखनीय म्हणजे, साध–ारणत: १९९७ पासून शासनाने अंशकालिन कर्मचाऱ्यांची भरती केली. पुढे लवकरच ही योजना बंद पडली. त्यामुळे १९९७ मध्ये पदवीधर असलेली व्यक्ती आता वयाची किमान ४६ वर्षे पूर्ण केलेली असण्याची शक्यता आहे. त्यामुळे जाहिरातीत नमूद वयोमर्यादेचा जवळपास सर्वच अंशकालिन उमेदवारांना फटका बसण्याची शक्यता वर्तविली जात असून जाहिरातीतंर्गत शुध्दीपत्रक काढून वयोमर्यादेत बदल करण्याची मागणी सुध्दा अनेक अंशकालिन उमेदवारांनी केली आहे.

### संघर्षाला हरताळ

**पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर शासनाने अंशकालिन उमेद–वार म्हणून रोजगार दिला. मात्र, शासकीय सेवेत सामावून घेतले नाही. अशंकालिन उमेदवारांवर बेरोजगारीची मार पडली. शैक्षणिक उमेदीचा काळ गेल्यानंतर अंशकालिन पदवीधरांच्या नशीबी केवळ संघर्ष राहीला. जवळपास १९९७ पासून शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी विविध आंदोलन, घेराव, मोर्चा काढून अंशकालिन उमेदवारांनी शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी रेटून धरली. वयाच्या अंतिम टप्प्यात त्यांच्या प्रयत्नाला यश आले. मात्र, शासनाचेच काही विभाग अशंकालिन उमेदवारांच्या शेवटच्या टप्प्यातील भरतीलाच हरताळ फासत असल्याचे दिसून येत आहे.**

# जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मयुरी गौतम द्वितीय



**अर्जुनी–मोरगाव :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्ष देशभर साजरा होत असताना ठिकठिकाणी अनेकविध उपक्रम घेण्यात येत आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी यांच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात स्थानिक शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय येथील बीएससी फायनलची विद्यार्थिनी मयुरी गौतम हिने वयोगट १९ ते २२ मध्ये सहभाग घेतला. तसेच "भारतीय संविधान' या विषयावर आपले व्हिडिओ क्लिप स्पर्धेकरिता पाठविले. यात तिला द्वितीय क्रमांक मिळाला.

म तिच्यापासून प्रेरणा घेऊन इतर विद्यार्थ्यांनी प्रोत्साहित होऊन अशा विविध स्पर्धामध्ये भाग घेत स्वतःचे नाव तसेच महाविद्यालयाचा नाव लौकिक यात निरंतर वाढ करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांनी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी याप्रसंगी तिचे अभिनंदन केले.

गोंदिया पोलीस दल व पो–लीस उपविभागीय अधिकारी देवरी यांच्यावतीने स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन मयुरी गौतम ला अर्जुनी मोरगाव येथील पोलीस स्टेशनमध्ये अर्जुनी–मोरगाव येथील एसडीएम डॉ.विजयकुमार सूर्यवंशी यांच्या हस्ते, तहसीलदार विनोद मेश्राम आणि पोलिस निरीक्षक सोमनाथ कदम यांच्या प्रमुख उपस्थित स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देवून गौरविण्यात आले.

# यूपीएससी प्रशिक्षणासाठी ऑनलाईन अर्ज करा,अनुसुचित जमातीच्या उमेदवारांसाठी संधी

**गोंदिया :** आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्र राज्यातील एकूण १०० अनुसुचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा (णझडउ) परिक्षा (पुर्व, मुख्य, मुलाखत) संपूर्ण तयारीकरीता दिल्ली येथील नामवंत खाजगी संस्थेमधुन प्रशिक्षण देणे करीता अनुसुचित जमातीच्या उमेदवाराकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर योजनेचा सविस्तर तपशिल, शासन निर्णय आवश्यक कागदपत्रांची इ. बाबतच्या अधिक माहितीकरीता **संकेतस्थळ** https://trti.maharashtra.gov.in **ला भेट द्यावे**

# बुस्टर डोससाठी द्यावे लागणार पैसे?

**गोंदिया:** कोरोना विषाणू संक्रमणाचा धोका अद्यापही टळला नाही. संक्रमणापासून बचाव व्हावा, यासाठी लस विकसीत करण्यात आली. शासनातर्फे डोस मोफत देण्यात येत आहेत. ज्यांचे दोन्ही डोस घेवून झाले, त्यांच्यासाठी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त १५ जुलै २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ दरम्यान मोफत डोस देण्यात येत आहेत. डोस मोफत देण्यात येत असले तरी आत्तापर्यंत केवळ ८ टक्के लोकांनीच बूस्टर डोस घेतला आहे. मोफत डोसची मुदत ३० सप्टेंबर रोजी संपुष्टात येणार आहे. त्यानंतर अद्याप तरी शासनाने तो डोस मोफत असणार की, पैसे द्यावे लागणार हे स्पष्ट केले नाही. असे असले तरी मोफत डोसकरिता देण्यात आलेल्या मुदतीत डोस घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

जिल्हा आरोग्य प्रशासनातर्फे १८ वर्षावरील सर्व लोकांना शासकीय लसीकरण केंद्रात मोफत लसीकरण मिळण्याच्या दृष्टिने सर्व उपाययोजना सुरु आहेत. जिल्ह्यात सर्व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या कडून गावोगावी लसीकरण केंद्र निर्माण केले जात असून सर्व स्तरावरील कर्मचारी यांच्या साठी शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था, शाळा, महाविद्यालये, पंचायत समिती कार्यालये, विविध कार्यालये, बाजार समिती आदी ठिकाणी नागरिक व कर्मचारी यांच्यासाठी लसीकरण शिबिरे आयोजित केली जात आहे. १५ जुलै २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीमध्ये १८ ते ५९ वयोगटातील नागरिकांनाही सर्व शासकीय कोविड लसीकरण केंद्रावर मोफत बूस्टर डोस मिळणार आहे.

केंद्र सरकारने १४ जुलै घेतलेल्या निर्णयानुसार १५ जुलै २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ या कालावधीमध्ये "कोविड लसिकरण अमृत महोत्सव" अंतर्गत एकूण ७५ दिवस सर्व शासकीय कोविड लसीकरण केंद्रावर १८ वर्षावरील सर्व नागरीकांना प्रिकॉशन डोज मोफत मिळणे सुरू आहे. सदर प्रिकॉशन डोज देण्यापूर्वी १८ वर्षावरील नागरीकांनी त्यांच्या कोविड लसीच्या दुसऱ्या डोसनंतर ६ महिने किंवा २६ आठवड्याचा कालावधी पूर्ण केले असल्या बाबत घोषित केले गेले. त्या निर्णयाला आज ३८ दिवस उलटले. जिल्ह्यात

## मोफत लसीकरणाला ३० सप्टेंबरची मुदत : अद्याप केवळ ८ टक्के लसीकरण

सुमारे ११ लाख ४२ हजार ८८३ लोकांना लसीकरणाचे उद्दिष्ट आहे. आतापर्यंत पहिला डोस ९४ टक्के, दुसरा डोस ७८ टक्के, तर प्रिकॉशन डोज (बूस्टर डोस) केवळ ८ टक्के लोकांनी घेतला आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त अमृत महोत्सवाचा भाग म्हणून कोविडचा प्रतिबंधात्म क डोज वाढविण्यासाठी मोहिम प्रसंगी केंद्र सरकारने निर्णय घेतल्याने बूस्टर डोस मोहिमेला गती मिळण्याची अपेक्षा होती. निर्णय घेऊन ३८ दिवस झाले तरी सुद्धा नागरिकांनी पुढे उस्फुर्तपणे येऊन लसीकरण केल्याचे चित्र पहावयास मिळालेले नाही. आर–ोग्य विभागातील आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका, आशा सेविका व सामुदायिक आरोग्य अधिकारी यांच्या एकत्रित जनजागृतीने जिल्ह्यात कोविड लसीकरण मोहिम अविरत सुरु आहे. आता ३० सप्टेंबर रोजी मोफत बूस्टर डोसची मुदत संपुष्टात येणार आहे. त्यापुढे डोस मोफत देणार, की त्याकरिता पैसे आकारणार हे अद्यापही स्पष्ट करण्यात आले नाही. त्यामुळे आहे त्या मुदतीत नागरिकांनी आपले लसीकरण करुन घेणे गरजेचे आहे.

# प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचा ७ वा स्थापना दिन १ रोजी

## *– विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार सत्कार

**गोंदिया :–**प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचा ७ वा स्थापना दिन कार्यक्रम १ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येणार आहे.परंपरेनुसार या कार्यक्रमात जिल्ह्यातील समाजकार्य, साहित्य, कृषी, शिक्षण व प्रशासकीय क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्तींची निवड करून त्यांचा गौरव पुरस्कार देवून सत्कार करण्यात येतो. तसेच पत्रकारिता क्षेत्रातील जीवन गौरव पुरस्कार प्रदान केले जाते. १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता हॉटेल गेटवे येथे स्थापन दिन व सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन खा.सुनिल मेंढे यांच्या हस्ते प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचे अध्यक्ष अपूर्व मेठी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आ.डॉ.परिणय फुके, आ.विनोद अग्रवाल, आ.विजय रहांगडाले, आ.मनोहर चंद्रिकापुरे, आ.सहषराम कोरोटे, जि.प.अध्यक्ष पंकज रहांगडाले, जिल्हाधिकारी नयना गुंडे, माजी आमदार राजेंद्र जैन, अदानी प्रकल्पाचे पियुष दिगावकर आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावषी प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियातर्फे स्व.रणजितभाई जसानी स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव सामाजिक सेवा पुरस्कार कुष्ठरोगासाठी सेवाकार्य करणा?या डॉ.जगन्नाथ राऊत, स्व.रामकिशोर कटकवार स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव कर्तव्यनिष्ठ पुरस्कार उपजिल्हाधिकारी सुभाष चौधरी, रामदेव जायस्वाल स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव साहित्यरत्न पुरस्कार रमेश शर्मा, स्व.मोहनलाल चांडक स्मृति प्रित्यर्थ जिल्हा गौरव कृषीरत्न पुरस्कार चोपराम कापगते, सहयोग संस्थानतर्फे शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा गौरव पुरस्कार खुशबू जगणे यांना दिला जाणार आहे. तसेच प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचा जीवन गौरव पुरस्काराने ज्येष्ठ पत्रकार संतोष नागनाथे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे कोरोना काळात सोनझारी समाजाद्वारे मोक्षधाम येथे केलेल्या सेवा कार्यासाठी त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन प्रेस ट्रस्ट ऑफ गोंदियाचे रवि आर्य, जयंत शुक्ला, संतोष शर्मा, हिदायत शेख, अंकूश गुंडावार, जावेद खान, हरींद्र मेठी, कपिल केकत, प्रमोद नागनाथे, मुकेश शर्मा, नरेश रहिले, भरत घासले, आशिष वर्मा, आर एच चौबे, योगेश राऊत, दिपक जोशी, सौ.अर्चना गिरी, बिरला गणवीर, आर व्ही जोशी आदिंनी केले आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड
## पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव,जिल्हा परिषद गोंदिया
## निविदा सुचना

निविदा क्रं.१ जा.क्र.४९ग्राप बोळदे/करड,दि.३०/०८/२०२२

ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड,पंचायत समिती अर्जुनी/मोर,जिल्हा परिषद गोंदिया.येथे १५ व्या वित्त आयोग अंतर्गत विवरणातील कामाचे बांधकामाची ई–निवीदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | वर्ष | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किमंत | अमानत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाढीव पाईप लाईन करणे | २०२०–२१ | १३१५००/– | ५००/– | १३१५/– | ६ महिने |
| २ | जिल्हा परिषद शाळेला पेव्हर ब्लॉक बसविणे | २०२१–२२ | १०००००/– | | १०००/– | ६ महिने |
| ३ | सिडी वर्क तयार करणे | २०२१–२२ | ५५०००/– | | ५५०/– | ६ महिने |

१) वरील कामाचे निविदा फार्म ३१/०८/२०२२ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०७/०९/२०२२ ला सायकांळी ३.०० वाजेपर्यंत(सुट्टीचे दिवस वगळून)या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल.व निविदा फार्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल.
२)सदर कामाच्या निविदा मोहोरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह ३१/०८/२०२२ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते दिनांक ०७/०९/२०२२ ला सायकांळी ३.०० वाजेपर्यंत(सुट्टीचे दिवस वगळून)या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड.येथे स्विकारण्यात येईल तसेच अमानत रक्कम भरल्याची पावती मिळेल.
३)मोहोरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड.येथ मासिक सभेत उघडण्यात येईल.
४)सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेली आहे.

**ग्रामसेवक** — **ग्रामपंचायत बोळदे/करड.**

**सरपंच** — **ग्रामपंचायत बोळदे/करड.**



## निविदा सूचना
## महाराष्ट्र शासन
## जलसंपदा विभाग

**Main Portal:**http.//wrd.maharashtra.gov.in

महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा, दुरध्वनी क्रमांक (०७१८४) २५०८९५, Email: eevhelidb@rediffmail.com हे महाराष्ट्रात नोंदणीकृत असलेल्या परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून खाली नमूद केल्याप्रमाणे कामाच्या ब–१ नमुन्यात त्यांची निविदा निश्चित करण्यासाठी प्रस्ताव मागवित आहेत.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. दस्तावेज कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा यांच्या कार्यालयात दि. २९/०८/२०२२ पासून उपलब्ध होवू शकतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजीत रक्कम रू. | इसारा रक्कम रू | निविदा उपलब्ध कालावधी | निविदा स्विकृती व उघडणे | प्रत्येक निविदा संचाची किंमत व (नापरतावा) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धापेवाडा टप्पा–१ च्या उपकेंद्राच्या आवारातील लोखंडी काम तसेच परिसरातील LED पथदिवे पुरवठा, उभारणी,चाचणी व कार्यान्वितीकरणाचे काम. (निविदा क्र.काअ/ विजबियउसिंविभं/ धापेवाडा टप्पा–१ उसिंयो/११/२०२२–२३) | ६,२३,७६७/– | ६५००/– | दि.२९/०८/२०२२ ते १२/०९/२०२२ | निविदा सादर करणे दि. १३/०९/२०२२ रोजी १२.०० वाजता पर्यंत व शक्य झाल्यास त्याच दिवशी १३.०० वाजता निविदा उघडण्यात येईल. | रू.२३६०/– (नापरतावा) |

२. केंद्र शासन, राज्य शासन किंवा स्थानिक संस्था यांनी आकारलेले सर्व कर, शुल्क (जी.एस.टी. वगळून) यांचा उद्धरत दरामध्ये समावेश असावा. निविदाकारानी जी.एस.टी. वगळून दर उद्धरत करावेत. स्वीकृत निविदा किमतीवर जी.एस.टी. देय राहील.
जी.एस.टी. शासनास वेळोवेळी भरण्याची संपूर्ण जवाबदारी कंत्राटदाराची राहील. कंत्राटदाराने जी.एस.टी. कंत्राटदाराने जी.एस.टी.भरणा केलेबाबतची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे, पुरावे, पावत्या सादर केल्यानंतर व त्याची आवश्यक खातरजमा या कार्यालयाने केल्यानंतरच त्याची कंत्राटदारास परतफेड करण्यास येईल.
२. निविदा विषयक थोडक्यात दिनांक निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे. सविस्तर निविदा सुचना http://wrd.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**टीपः-** कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा तसेच निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे.

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता**
**विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग,**
**भंडारा.**

प्रत–सुचना फलक, कार्यकारी अभियंता, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचन विभाग, भंडारा

जिमाका/गो.क्र/३०/२०२२


# राष्ट्रवादी काँग्रेसला बळकट करण्यासाठी कामाला लागा: माजी आमदार जैन

**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व घटकांनी पक्षाला बळकट करण्यासाठी जबाबदारीने कामाला लागावे. आगामी नगर परिषद निवडणुकीच्या अनुसंगाने प्रत्येक प्रभागात सदस्यता अभियान व बुथ कमिटी तयार करावे. एकजुटीने पदाधिकारी व कार्यकत्यांनी याची जबाबदारी घेतली पाहिजे. आपण सर्वांनी मिळून राष्ट्रवादीला अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महीला, युवक, युवती, विद्यार्थी, ओबीसी, मागासवर्गीय सेल सहीत सर्व संगघटनांनी कामाला गावे, असे आवाहन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले. तिरोडा येथील कुंभारे लॉनमध्ये शहर राष्ट्रवादी काँग्रेसची सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला संबोधित करताना जैन बोलत होते.



सभेत तिरोडा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर पदाधिकारी, कार्यकर्ता पक्ष संघटनेचे विविध संघटनाने पुढारी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आढावा घेण्यात आला. तसेच आगामी निवडणुकीच्या अनुसंगाने कार्यकत्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच तिरोडा शहरातील विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

माजी आमदार जैन यांनी तिरोडा शहर व तालुक्याच्या विकासासाठी सदैव कटिबध्द असल्याचे व्यक्त केले. खा.प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वात तिरोडा शहराच्या विकासात कोणतीही तडजोड करणार नाही, असे व्यक्त केले.

यावेळी डॉ.अविनाश जायस्वाल, नरेश कुंभारे, अजय गौर, राजेश गुनेरिया, सलीम जवे–री, विजय बनसोड, प्रभु असाटी, अनिल पारधी, मुन्ना उपवंशी, ममता बैस, राखी गुनेरियां, ममता हट्टेवार, जगदीश कटरे, प्रशांत डहांटे, बाडू येरपुडे., राहुल गहेरवार, बबलू ठाकुर, भोजराज धामेचा, मुकेश बरियेकर, राजेश श्रीरामे, संदीप मेश्राम, नागेश तरारे, गोपी पुड.के, नरेश धुर्वे, सिंधु हीरापुरे, अतुल गजभिये, स्वप्निल सहारे, विशेष छूगाणी सहीत बहुसंख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

साप्ताहिक बेरार टाईम्स | निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक | http://berartimes.com | बुधवार, दि.३१ ऑगस्ट २०२२ 

# कोयार व झारेवाडा जंगलात नक्षली जेरबंद

**गडचिरोली:** मागील काही वर्षाच्या इतिहासात जिल्हा पोलिस दल नक्षल्यांच्या कारवायावर भार पडत असल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत अनेक नक्षल्यांची खात्मा केला आहे. तसेच अनेक नक्षल्यांना अटक केली आहे. तसेच शेकडो नक्षल्यांनी पोलिसांपुढे शस्त्र टाकून आत्मसर्मपण केले आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात नक्षल चळवळी कमजोर होत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान रविवारी दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून तीन जहाल नक्षल्यांना अटक करण्यास पोलिस दलातील सी-६० जवांना मोठे यश आले आहे.

२८ ऑगस्ट रोजी उपविभाग भामरागड अंतर्गत येणाऱ्या पोमके लाहेरी हद्दीतील कोयार जंगल परिसरात विशेष अभियान पथक (सी-६०) व सीआरपीएफ बटालियन ३७ चे जवान संयुक्त नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना २ जहाल नक्षलवाद्यांना अटक तसेच उपविभाग हेडरी अंतर्गत पोमके गट्टा (जां) हद्दीतील झारेवाडा जंगल परीसरात विशेष अभियान पथकाचे जवानांनी १ जहाल नक्षलवाद्यांस अटक करण्यात आली. कोयार जंगल परिसरामध्ये अटक करण्यात आलेल्या जहाल नक्षलवाद्यांमध्ये रमेश पल्लो (२९) रा. कोयार ता. भामरागड, तानी ऊर्फ शशी चमरु पुंगाटी (२३)रा. पद्दुर ता. भामरागड यांचा समावेश आहे. तर झारेवाडा जंगल परीसरामध्ये अर्जुन ऊर्फ महेश रैनु नरोटे (२७) रा. झारेवाडा ता. एटापल्ली यास अटक करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या तिन्ही नक्षल्यांवर शासनाने १० लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.



अटक करण्यात आलेले नक्षली

रमेश पल्लो हा सन २०१९ मध्ये भरती होऊन कंपनी १० चा अँक्शन टिम मेंबर व स्कॉऊट टिम मेंबर म्हणुन कार्यरत होता. सद्या तो स्कॉऊट टिम मेंबर म्हणुन कार्यरत होता. त्याच्यावर ३ खुन, ८ चकमक, १ जाळपोळ, १ इतर अशा एकुण १३ गुन्ह्यामध्ये समावेश आहे. शासनाने रमेशवर ४ लाखाचे बक्षीस जाहीर केले होते. नामे-तानी ऊर्फ शशी चमरु पुंगाटी ही सन जुलै २०१५ मध्ये नक्षलमध्ये भरती झाली. २०१६ ते २०१९ पर्यंत ती प्लाटुन क्र. ७ मध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. २०१९ ते आतापर्यंत ती कंपनी क्र. १० मध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. तिचा ४ खून, ३ चकमक अशा एकुण ७ गुन्ह्यामध्ये समावेश आहे. शासनाने तानीवर ४ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. नामे अर्जुन ऊर्फ महेश रैनु नरोटे हा सन २०१० मध्ये पेरमिली दलम सदस्य पदावर भरती होवुन २०१३ पर्यंत कार्यरत होता. २०१३ पासून प्लॉटुन क्र. १४ मध्ये कार्यरत होता.

ऑगस्ट २०१३ मध्ये सिरोंचा दलममध्ये बदली होवुन २०१८ पर्यंत सदस्य पदावर कार्यरत होता. मे २०१८ पासून ते आजपर्यंत तो भामरागड दलममध्ये कार्यरत होता. त्याचा ७ खुन, ९ चकमक, २ जाळपोळ, २ दरोडा, १ जबरी चोरी व इतर २ अशा एकूण २४ गुन्हयामध्ये समावेश आहे. अर्जुनवर शासनाने २ लाखाचे बक्षीस जाहीर केले होते.

# पशुवैद्यकीय दवाखान्यातील गैरप्रकार उघडकीस




**सडक अर्जुनी:** तालुक्यातील कोसमतोंडी येथील व संपूर्ण परिसरातील जनावरांसाठी उपलब्ध असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यात अनेक समस्या असून या दवाखान्यातील कर्मचाऱ्याचे शासकीय सामानाचे अफरातफरीचे गैरप्रकार उघडकीस आले आहे. याप्रकरणी ग्रामस्थांनी वरिष्ठांकडे तक्रार केली आहे. कोसमतोंडी येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात मागील अनेक वर्षे डॉक्टर नव्हते. ते रुग्णालयाचा प्रभार सौंदड येथील डॉ. चन्ने यांच्याकडे होता. आठवड्यातून एक किंवा दोनच दिवस रुग्णालयात येत असत, त्यामुळे कोसमतोंडी व परिसरातील मुरपार, लेंडेझरी, धानोरी, चिचटोला, थाडेझडे, बोरुंळा गावातील गोपालक व शेतकऱ्यांना कमालीचा त्रास सहन करावा लागत होता.

रुग्णालयात पूर्णवेळ डॉक्टरची मागणी लावून धरल्यावर ६ एप्रिल रोजी रुग्णालयात डॉ. राऊत रुजू झाले. परंतु ते रुजू होण्याआधी रुग्णालयातील परिचराने अनेक गैरप्रकार केल्याचे काही नागरिकांचा आरोप आहे.

रुग्णालयातील पाण्याची मोटर, फ्रिजसह डॉक्टरांच्या निवासस्थानातील कुलर गायब असल्याचे तक्रार नागरिकांनी तालुका वैद्यकीय अधिकारी व जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांना फोन दिली होती. तसेच डॉक्टरांची राहण्याची अडचण लक्षात घेता काही नागरिकांनी चपराश्याला तक्रारीचा धाक दाखवला असता त्याने पाण्याची मोटर व मोडकळीस आलेला कुलर आणून दिला. तसेच रुग्णालयात येणाऱ्या औषधांच्या नोंदी योग्य प्रकारे केलेल्या नसून अनेक औषधी परिसरातील खासगी डॉक्टरांना विकल्या जाण्याच्या तक्रार नागरिक केली आहे. त्यामुळे डॉक्टरांच्या अनुपस्थितीत रुग्णालयातील शासकीय साहित्याची अफरातफर करणाऱ्या चपराश्यांवर कार्यवाही करुन याला नोकरीतून बडतर्फ करावे अशी मागणी नागरिकांनी तालुका वैद्यकीय अधिकारी व खंडविकास अधिकारी वाघाये यांच्याकडे केली आहे.

रुग्णालयातील फ्रिज सौंदड येथे नेण्यात आला आहे. मी रुजू झाल्यानंतर अडीच ते तीन महिने मला कुलर अभावी त्रास सहन करावा लागला. पिण्याच्या पाणी भरण्याची मोटर सुद्धा गायब होती. याची माहिती मी माझ्या वरिष्ठांना दिली असल्याचे कोसमतोंडीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राऊत यांनी सांगितले.

# दोन मतदारसंघाच्या कचाट्यात पूल

## म्हसगावजवळील पांगोली नदीवरचा पूल जीवघेणा: अपघाताची मालिका सुरुच



**सतत निवेदन देऊनसुद्धा पुलाचे बांधकाम मंजूर होत नाही. लवकरच संघर्ष समितीची स्थापना करण्यात येणार असून पुल बांधकाम मंजुरीसाठी पांगोली नदीवर सत्याग्रह करणार आहोत.**

**सोमेश रहांगडाले**
**तालुकाध्यक्ष, सरपंच संघटना गोरेगाव**

**गोरेगाव:** गोरेगाव-म्हसगाव रस्त्यावर पांगोली नदी आहे. ही नदी दोन विधानसभा मतदारसंघाची सिमारेषा असल्याने या नदीवर नवीन पुलाचे बांधकाम कित्येक वर्षापासून रखडले आहे. त्यामुळे अनेक अपघात घडले असून, आताही अपघाताची मालिका सुरुच आहे. लोकप्रतिनिधींनी पुल बांधकाम अडकविले की काय? असा प्रश्न सरपंच सोमेश रहांगडाले यांच्यासह नागरिकांना पडला आहे.

गोरेगाव तालुक्यातील गावे अर्जुनी मोरगाव व तिरोडा-गोरेगाव विधानसभा क्षेत्रात येतात. अर्जुनी मोरगाव मतदारसंघाची सिमारेषा म्हसगाव पांगोली नदी आहे. या पांगोली नदीवर ४० वर्षापुर्वी अरुंद व कमी उंचीच्या पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. पावसाळ्यात पुराचे पाणी या पुलावर ८ फुटपर्यंत राहते. त्यामुळे २० ते २५ गावांचा गोरेगावशी संपर्क तुटतो. पुल अरुंद असल्याने अनेकदा अपघात झाले असून दोन व्यक्ती मृत्यूमुखी पडले आहेत.

बबईचे सरपंच सोमेश रहांगडाले हे मंत्री, खासदार, आमदार, पालकमंत्री यांना म्हसगावजवळील पांगोली नदीवर नवीन पुलाचे बांधकाम करण्यात यावे, यासाठी १५ वर्षापासून निवेदन देत आहेत. यंदा जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला गेला. या नदीवर पुल बांधण्यात यावे व नागरिक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून द्यावा, याकरिता सरपंच सोमेश रहांगडाले यांनी आमदार मनोहर चंद्रीकापुरे यांना नुकतेच निवेदन देऊन नवीन पूल बांधकामाचा पाठपुरावा करावा, अशी विनंती केली. पण पांगोली नदी दोन विधानसभा मतदारसंघाची सिमारेषा असल्याने दोन्ही आमदारांनी आपापल्या सिमारेषेपर्यंत तरी पुलाचे बांधकाम मंजूर करुन बांधकाम सुरु करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रम राबवावे-अशोक बनकर



**देवरी:-** यावर्षी सर्व गणेशमंडळांनी गणेशोत्सव काळात सामाजिक उपक्रम राबवून सामाजिक सलोखा जपण्यासाठी कार्य करीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, आवाहन गोंदियाचे अप्पर पोलिस अधीक्षक अशोक बनकर यांनी केले आहे.

ते देवरी येथील पोलिस स्टेशनमध्ये (दिं.२९) रोजी आयोजित शांतता बैठकीत उपस्थित गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी देवरीचे ठाणेदार रेवचंद सिंगनजुडे हेही उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ठाणेदार सिंगनजुडे म्हणाले की, सर्व गणेश मंडळांनी कायद्याचे पालन करावे. या उत्सवात होणाऱ्या खर्चात काटकसर करून त्या पैशाचा उपयोग लोकोपयोगी कार्यात करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले. याशिवाय या कालावधीत डीजेचा वापर टाळण्यासंदर्भात प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे आश्वासन दिले. नियमांत शिथिलता दिली असली तरी कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही,याची दक्षता घ्यावी, असे ही सिंगनजुडे म्हणाले.

# जिल्ह्यात एक रुग्ण कोरोना बाधित

**गोंदिया :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ३० ऑगस्ट रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवीन एक कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आला, तर डिस्चार्ज रुग्णांची संख्या निरंक आहे. आजपर्यंत ४६,८०१ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले. ४६,०१२ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या १४ आहे. यापैकी १३ बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहेत, तर १ बाधित रुग्ण भरती आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील ५८९ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९८.२३ टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२७ टक्के आहे तर डब्लिंग रेट ७५.५ दिवस आहे.

# डांगोर्ली बंधारा निर्माणासाठी निर्देश द्या



**गोंदिया:** गोंदिया विधानसभा क्षेत्रातील बाघ नदीवर अंतरराज्यीय डांगोर्ली बंधारा निर्माणासाठी दोन्ही राज्यातील सरकारला निर्देश देण्यात यावे, अशी मागणी माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन केली.

भारतीय जनता पार्टीचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सोबत माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी राज्याचे महामहिम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. यावेळी गोपालदास अग्रवाल यांनी गोंदिया विधानसभा क्षेत्र व मध्यप्रदेश, छत्तीसगड राज्याला लागून असलेली विशीष्ठ भौगोलिक परिस्थिती, नक्षलवाद समस्या, विकास योजनांबाबत जाणीव करुन दिली. बाघ नदीवरील डांगोर्ली अंतरराज्यीय बंधारा निर्माणासाठी महाराष्ट्र व मध्यप्रदेश सरकारला निर्देश देण्यात यावे. शासकीय मेडीकल कॉलेज, पॉलिटेक्निक व शासकीय नर्सिंग कॉलेजची समस्या, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे धानपिकाचे नुकसान झाल्यामुळे त्यांना त्वरित आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी.

# नक्षलविरोधी शीघ्रकृती दलातील जवानाचा सहकाऱ्यावर गोळीबार

**गडचिरोली:-** सकाळच्या सुमारास गस्तीवर असलेल्या नक्षल विरोधी शीघ्रकृती दल पोलीस पथकाच्या एका जवानाने सहकाऱ्यावर गोळीबार केल्याने एकच खळबळ उडाली. ही घटना एटापल्लीपासून जवळच असलेल्या आलदंडी मार्गावर घडली.

संतोष सिडाम असे आरोपी जवानाचे नाव असून विजय करमे असे जखमी जवानाचे नाव आहे. एटापल्ली उपविभागीय पोलीस कार्यालयाच्या अखत्यारीत येत असलेल्या पोलीस पथकातील शीघ्रकृती दलाचे जवान आज सकाळी गस्तीवर होते. दरम्यान, संतोष आणि विजय या दोन जवानांमध्ये वाद झाला. यातून संतोषने विजयवर थेट गोळीबार केला. यात विजय गंभीर जखमी झाला असून त्याला तत्काळ हेलिकॉप्टरमधून नागपूर येथे नेण्यात आले. सध्या जखमी जवानाची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.



गोळीबारात जखमी झालेल्या जवानाला नागपूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे.

# आदर्श शिक्षकांच्या वेतनवाढीला जिपचा खो!

## न्यायालयाच्या आदेशानंतरही वेतनवाढ नाही : शिक्षकांमध्ये संताप

**गोंदिया:** शासनाच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला असताना जि.प.कडून आगाऊ वेतन देण्यास नकार देण्यात आले होते. यावर राज्यातील आदर्श शिक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. दरम्यान, न्यायालयानेही या शिक्षकांच्या बाजूने निकाल देत सन २०१८ पर्यंतच्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतन वाढ देण्याचे आदेश दिले. यानुसार राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षकांना याचा लाभ देण्यात येत आहे. मात्र, गोंदिया जिल्हा परिषदेकडून अद्यापही १०७ शिक्षकांपैकी २० आदर्श शिक्षकांना वेतनवाढीची दमडीही देण्यात आली नाही. त्यामुळे जि.प.च्या या कारभारामुळे शिक्षकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे.



जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या ग्राम विकास विभागाच्या वतीने जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार ही योजना जिल्हा परिषदेच्या स्तरावरुन राबविली जात होती.

दरम्यान, विभागाने काढलेल्या या परिपत्रकानुसार पुरस्कारप्राप्त शिक्षकांना एक आगाऊ वेतन देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, सन २०१० या वर्षी आगाऊ वेतनवाढ देण्यासाठी होणारा खर्च ग्राम विकास विभागामार्फत देण्याची तरतूद नसून, जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वनिधीतून खर्च करावा अशी तरतूद असल्याचे पत्रक दिले. तर ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीत शासनाने आगाऊ वेतनवाढ देण्याची योजना बंद करण्याचा निर्णय दिला. दरम्यान सन २०१६ पर्यंत त्यात जिल्ह्यात ८७ आदर्श शिक्षकांची नोंद करण्यात आली असतानाच या संदर्भात शिक्षकांनी उच्च न्यायालयात धाव घेत फेब्रुवारी २०२१ या वर्षी आदर्श शिक्षक हरीराम येळणे व इतर ८७ जणांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. अन्वये न्यायालयाने शिक्षकांच्या बाजूने न्याय देत ४ सप्टेंबर २०१८ पर्यंतच्या जिल्हा पुरस्कारप्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देण्याची कार्यवाही जिल्हा परिषदांनी त्यांच्याकडील उपलब्ध निधीतून करावी, असे आदेश दिले. यानुसार संपूर्ण राज्यातील २०१८ पर्यंतच्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतन वाढीचा लाभ देण्यात आला. यात गोंदिया जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी राजा दयानिधी यांनीही जिल्ह्यातील ८७ शिक्षकांना वेतनवाढ देण्याचे आदेश दिले होते. मात्र, त्यानंतर २०१६ ते २०१८ या कालावधीतील पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सदर वेतनवाढीपासून दुर ठेवण्यात आले. परिणामी न्यायालयाच्या जुन्या निकालाच्या आधारावर आदर्श शिक्षक मधुकर पारधी व इतर ११, शरद उपलवार व इतर ३, पी. एम. मेश्राम तिरोडा तसेच एन.सी. बिजेवार व इतर ५ अशा २० शिक्षकांकडून चार याचिका डिसेंबर २०२१ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या. ज्याचा निकाल फेब्रुवारी २०२२ मध्ये लागला असून सदर निकालानुसार या आदर्श शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देण्याचे आदेश देण्यात आले. यात नागपूर, भंडारासह इतर जिल्ह्यातील आदर्श शिक्षकांना याचा लाभ मिळत असताना गोंदिया जिल्हा परिषदेकडून अद्यापही या २० आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात आलेला नाही.

दरम्यान, या शिक्षकांकडून वारंवार जिल्हा परिषदेच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे मागणी करण्यात येत असली तरी जिल्हा परिषदेकडून याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे या शिक्षकांमध्ये जिल्हा परिषदेच्या या कारभारावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### म्हणे सदस्यांचा निधी कमी होणार

**जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून या आदर्श शिक्षकांना आगाऊ वेतनवाढ देण्याचा निर्णय असताना गोंदिया जिल्हा परिषदेकडून ही वेतनवाढ देण्यात आलेली नाही. तर यासंदर्भात अधिक माहिती घेतली असता या शिक्षकांना वेतनवाढ दिल्यास जि.प. सदस्यांचा निधी कमी होईल असा संभ्रम असल्याचे दिसून आले.**

### ५ सप्टेंबरपूर्वी वेतनवाढ मिळावी

**शासनाच्या निर्णयानुसार व न्यायालयाच्या आदेशानुसार २०१८ पर्यंतच्या आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांना येत्या ५ सप्टेंबरपूर्वी वेतनवाढ देण्यात यावी. असे झाल्यास शिक्षक दिनाच्या निमित्ताने या शिक्षकांचा सन्मान होईल.**

**हरिराम येळणे, आदर्श शिक्षक**

### मार्गदर्शन घेण्यात येत आहे

**शासनाच्या निर्णयानुसार २०१८ पर्यंतच्या आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून वेतनवाढ देण्याचे आदेश आहेत. मात्र, शिक्षकांना ३-शिक्षण हेड मधून कोषागार कार्यालयाकडून वेतन देण्यात येत असताना जिल्हा स्वनिधीतून वेतनवाढ कशी देणार हा प्रश्न आहे. तेव्हा या विषयी वरिष्ठांकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.**

**अनिल पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गोंदिया**

# तीन वर्षानंतर इटियाडोह ओव्हरफ्लो

## पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ : परिसराचे सौंदर्य निघाले फुलून



**अर्जुनी मोरगाव:** मातीने तयार करण्यात आलेले जिल्ह्यातील प्रसिद्ध ईटीयाडोह धरण सुटीच्या दिवशी पर्यटकांनी फुलुन जाते. सुट्याच्या दिवसामध्ये हजारो पर्यटक या धारणाला भेट देतात. या वर्षी पर्यटकांच्या संख्येत चांगलीच वाढ झाल्याचे दिसून येत आहे. निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या धरणावर निसर्गाने मुक्त उधळण केली आहे. अल्प पर्जन्यमनामुळे २०१३ नंतर २०१९ आणि त्यानंतर आता यावर्षी धरण ओव्हरफ्लो झाल्यामुळे पर्यटकांची गर्दी वाढली आहे.

महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, आंध्रप्रदेशातूनही पर्यटक या ठिकाणी मोठ्या उत्साहाने येतात. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील असलेल्या पर्यटन स्थळांकडे आकर्षित होतात. निसर्गाच्या कुशीतील तालुक्याच्या पर्यटनासाठी पर्यटक बेत आखतात. नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान, प्राचीन प्रतापगड किल्ला व हिंदू मुस्लीम एकात्मतेची ओळख असलेली महादेव पहाडी, ख्वाजा उष्मान गणी हरुणी यांचा दर्गा, जवळच असलेली तिबेटीयन बांधवांची वसाहत व बुद्ध स्तूप, बोंडगाव देवी येथील कुलस्वामीनी माता गंगा जमुना हे तालुक्यातील प्रमुख पर्यटनाचे केंद्र आहे. या ठिकाणी ही पर्यटक मोठ्या प्रमाणात भेट देतात. परिसरातील प्रमुख केंद्र ईटीयाडोह धरण आहे. हे धरण पर्वतांच्या मधोमध आहे. यामुळे कुणीतरी जादूगाराने जणू जादू करूनच धरण निर्माण केल्याचाही भास होतो. भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील हजारो हेक्टर जमीन सिंचित करणारे हे धरण आज घडीला शासनाच्या दुर्लक्षितपणाचा बळी ठरत आहे.

### सोयी सुविधांकडे दुर्लक्ष

**इटियाडोह हे स्थळ शासन आणि लोकप्रतिनिधींच्या उदासीनपणाने पर्यटकांना मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. जिल्हा भरातील जनतेची व शेतकऱ्यांची तहान भागवणाऱ्या स्थळी शुद्ध पिण्याचे पाणी, स्वछता गृहांची वानवा असल्याने महिलांना कमालीचा त्रास सहन करावा लागतो. इथे खूप भव्य रेस्ट हाऊस आहे. मात्र, रेस्ट हाउसमधील विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला आहे. रेस्ट हाउसमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही. येणाऱ्या पर्यटकांसाठी राहाण्याची, खाण्याची आणि पार्किंगची सुविधा नसल्याने पर्यटक या ठिकाणी येऊन सुविधा नसल्याने आपले रोष जनप्रतिनिधी व शासनाकडे व्यक्त करत असतात.**


### रोजगार निर्मितीला वाव

**धरण परिसरात पर्यटनाला भरपूर वाव असल्याने येथील बेरोजगार युवकांना रोजगराच्या संधी उपलब्ध करून देता आल्या असत्या. मात्र, राजकीय इछा सत्तीचा अभाव असणाऱ्या लोकप्रतिनिधी मुळे रोजगार ठप्प आहे. धरणात बारमाही बोटिंग सुरू ठेवणे सहज शक्य आहे. मत्स्यव्यवसायाला प्राधान्य देण्यासाठी या सारखे दुसरे ठिकाण नाही. जंगल सफारी सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. हॉटेल, रिसॉर्ट या सारख्या व्यवसायांना संधी आहे. फक्त गरज आहे, शासनाने या ठिकाणी लक्ष देण्याची. त्यामुळे पर्यटन धोरणातून या स्थळाचा विकास होण्यासाठी मोठी मद्दत होणार आहे.**

### सुरक्षेचाही अभाव

**२६ जानेवारी २०१८ ला धरणाच्या सांडव्यात सेल्फी घेण्याच्या नादात दोन तरुण बुडाले. त्या वेळी काही काळापुरता या ठिकाणी पोलीस बंदोबस्त होता. मात्र, या ठिकाणी प्रसाशनाने कोणत्याही प्रकारच्या सुरक्षेच्या गोष्टी लावलेल्या नाहीत. त्यामुळे पुन्हा कोणतीही मोठी घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या धरणाकडे कुणाचेही लक्ष नसल्याने असामाजिक तत्वाचा त्रास वाढत चालला आहे. याचा त्रास येणाऱ्या पर्यटकांना सहन करावा लागत आहे.**

# रब्बी पिकाचे १०० टक्के धान खरेदी करा-किसान काँग्रेसचे निवेदन



**गोंदिया:-** गोंदिया जिल्हा किसान काँग्रेसच्या वतीने शेतकऱ्यांच्या रब्बी पिकाच्या धानाची १००% खरीदी करण्याच्या मागणीचे निवेदन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष दिलीप बनसोड व जिल्हा किसान काँग्रेस अध्यक्ष जितेश राणे यांच्या नेतृत्वात सदर निवेदन देण्यात आले.

निवेदनात गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाइन केलेली धान १००% खरेदी करण्यात यावे असे म्हटले आहे. निवेदन देताना प्रदेशचे सचिव अमर वराडे, प्रदेश सचिव पी.जी.कटरे, गोंदिया काँग्रेस उपाध्यक्ष गप्पू गुप्ता, सेवादल जिल्हाध्यक्ष इंजि राजीव ठकरेले, जितेन्द्र कटरे जि.प.सदस्य तथा जिला अध्यक्ष ओबीसी, सौ. उषाताई मेंढे माजी जि.प.अध्यक्ष, किसान कांग्रेस जिला उपाध्यक्ष संदीप चव्हाण, तालुका अध्यक्ष सूर्यप्रकाश भगत, योगेश बापू अग्रवाल, शहर अध्यक्ष जहीर अहमद, एनएसआयचे जिल्हाध्यक्ष हरीश तुलसकर, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रवेश बेग, अलोक मोहंती माजी यूवक कांग्रेस अध्यक्ष, शहर सचिव अरुण गजभिए, विजेंद्र बरोंडे, तालुका उपाध्यक्ष हंषराज गएगये, ओबीसी जिल्हा सचिव अजयकुमार राहांगडाले, प्रदीप शहारे, पप्पू पटले, रवि रिणायत, सुनिल शिवणकर, मंथन नंदेश्वर इत्यादि पदाधिकारी उपस्थित होते.

**गोरेगाव तालुका काँग्रेसचे मुख्यमंत्र्यांना निवेदन**

**गोरेगाव:** गोरेगाव तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने तहसिलदारामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करुन अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या शेतपिकाला हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्यात यावे. अतिवृष्टीमुळे पडलेल्या घरापोटी १.५० लाख रुपये मदत देण्यात यावी. नियमित कर्ज भरणारे शेतकर्यांना प्रोत्साहन रक्कम त्वरीत देण्यात यावे. आनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे धान १०० टक्के खरेदी करण्यात यावे आदी मागण्यांचा यात समावेश होता.

निवेदन देतेवेळी प्रदेश काँग्रेस सचिव पी.जी.कटरे, जिल्हा कांग्रेस उपाध्यक्ष झामसींह बघेले, तालुका काँग्रेस कमेटी अध्यक्ष डेमेन्द्र राहांगडाले, जिल्हा महासचिव जगदिश येरोला, जिल्हा परिषद सदस्य शशी भगत, जितेन्द्र कटरे, ओमप्रकाश कटरे, राजेन्द्र राठोड, खीरचंद येळे, भुमेश्वरी राहांगडाले, मलेश्याम येरोला, नामदेव नाईक, उत्तम कटरे, भीमराज टेंभुणीकर, दिलराज शिंगाळे, मालीकचंद मेळे, नरेन्द्र राहांगडाले, मोरेश्वर गौतम, चुळामण राहांगडाले आदी उपस्थित होते.